


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २११ ■ शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# शेगावी जमला भाविकांचा मेळा..!

## ▶▶श्रींच्या ओढीने भाविक शेगाव नगरीकडे रवाना ▶▶ विदर्भाच्या पंढरीत भक्तांची अलोट गर्दी ▶▶दिंडी मार्ग श्रीभक्तांनी फुलला ▶▶दिंड्या, पायदळ वारकऱ्यांची मांदियाळी

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**शेगांव :** विदर्भाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या संतनगरी शेगावात ८ फेब्रुवारीला श्री संत गजानन महाराजांचा प्रगट दिन महोत्सव साजरा होणार आहे. या क्षणाचे आपणही साक्षीदार व्हावे, आपली श्रद्धा श्रीचरणी अर्पण करण्यासाठी लाखो भाविकांनी शेगावची वाट धरली आहे. दिंड्या, पालख्यांसह असंख्य भाविक पायी वारी करीत आहेत. यामुळे दिंडी मार्ग भाविकांनी शनिवारी सकाळपासूनच फुलला आहे. "जय गजानन, श्री गजानन" असे नामस्मरण करीत भाविक श्रींच्या दर्शनाच्या ओढीने निघाले आहेत. या भाविक भक्तांची सेवा म्हणजेच श्रींची सेवा असे मानत अनेक सेवाभावी संस्था या भाविकांना चहा, फराळ, जेवण देण्यासाठी सरसावल्या असून, अकोला ते शेगाव या दिंडी मार्गावर जागोजागी स्टॉल लावले आहेत. जिल्हाच नव्हे तर आजूबाजूच्या जिल्ह्यातील भाविक शेगावच्या दिशेने निघाल्याने रविवारी लाखो भाविक भक्तांची शेगावात मांदियाळी जमणार आहे.

विदर्भाचे पंढरपूर किंवा प्रतिपंढरपूर म्हणून संतनगरी शेगावची ख्याती दिवसेंदिवस वाढत आहे. विदर्भाचे आराध्य दैवताचा रविवारी प्रगटोत्सव साजरा होत असल्याने लाखो भाविक शेगावात जमणार आहेत. याची योग्य ती व्यवस्था राखण्यासाठी प्रशासन व सेवाभावी संस्था सज्ज झाल्या आहेत. भाविकांच्या सुविधेला बाधा पोहोचू नये, कोणता अनुचित प्रकार घडू नये, याची खबरदारी घेत पोलिस प्रशासनानेही बंदोबस्त वाढविला आहे. अकोल्यासह बुलडाणा, वाशिम, अमरावती सह अनेक ठिकाणांवरून भाविक शेगावी येत असल्याने मोठा जनसमुदाय या ठिकाणी जमणार असल्याची शक्यता लक्षात घेऊन तशी सुविधा व व्यवस्था श्री संत गजानन महाराज संस्थानकडून करण्यात आली आहे. भाविक भक्तांना शांततेत श्रींचे दर्शन घेता यावे, याची चोख व्यवस्थाही करण्यात आली आहे. एकूणच श्रींच्या प्रगटोत्सवासाठी संतनगरी सज्ज झाल्याचे चित्र शनिवारपासूनच दिसून आले आहे.



### श्रींचे मंदिर ७ व ८ रोजी दर्शनासाठी रात्रभर खुले राहील

श्री संत गजानन महाराज संस्थान शेगांवच्या वतीने श्रींच्या १४८ प्रगटदिन उत्सवा करिता श्री चे मंदिर दर्शनसाठी दोन दिवस खुले राहणार आहे यामुळे भाविक भक्तांना श्रींच्या समाधी मंदिराचे दर्शन घेता येणार आहे.

श्रींच्या प्रगटदिन महोत्सवानिमित्त गेल्या सात दिवसापासून मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे या सप्ताहामध्ये राज्यातील भजनी दिंड्या शेगाव येथे दाखल होत आहे भजनी दिंड्यांमधील वारकरी भाविकांनी श्रीच्या समाधी मंदिराचे दर्शनासाठी दि. ७ व ८ फेब्रुवारी रोजी श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले राहिलं.

श्रींच्या दर्शनासाठी होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेवून समाधी मंदिर दि. ७ वार शनिवार व दि. ८ रविवार २०२६ रोजी श्री दर्शनार्थ रात्रभर खुले राहील. त्यामुळे रात्री येणाऱ्या भाविकांना पहाटे श्रींचे दर्शन, महाप्रसाद घेऊन आपल्या गावी परत जाणार आहे तरी श्रींच्या भावीकभक्तांनी यांचा लाभ घ्यावा.

### भक्तांच्या सेवेसाठी सेवाभावी संस्थांचा पुढाकार



अकोल्यावरून शेगावला पायी जाणाऱ्या भाविक भक्तांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. हे भाविक भक्त रविवारी प्रगट दिन असल्याने शनिवारी सकाळपासूनच शेगावच्या दिशेने रवाना झाले आहेत. त्यांच्या चहा, पाणी, फराळ आणि जेवणाची व्यवस्था शेगाव दिंडी मार्गावर जागोजागी स्टॉल लावून सेवाभावी संस्थांनी केली आहे. डाबकी रोड रेल्वे गेटपासून ते नागझरीदरम्यान भौरद फाटा, गायगाव पेट्रोल डेपो, कस्तुरी चॅरिटेबल, गायगाव गाव, गायगावचे मंदिर, निमकर्दा, अडोसी कडोसी, नागझरी असे जागोजागी भाविकांसाठी स्टॉल लावले आहेत.

### वैद्यकीय सेवेसाठी डॉक्टर व कर्मचारी सरसावले!

श्री भक्तांची आपल्या हातून सेवा व्हावी, यासाठी डॉक्टर व कर्मचारी मंडळींनीही पुढाकार घेतला असून, पायी वारी करणाऱ्या भाविकांना वैद्यकीय सेवा लागल्यास तीही मोफत दिंडी मार्गावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांनीही जागोजागी दिंडी मार्गावर बंदोबस्त लावला आहे.

### धन्य आज दिन संत दर्शनाचा..

श्रींच्या प्रगटदिन महोत्सवानिमित्त गेल्या सात दिवसापासून मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये राज्यभरातील भजनी दिंड्या, पालख्या शेगाव येथे दाखल होत आहेत. तसेच पायी वारी करणाऱ्यांचीही मोठी संख्या असून, तेही शेगावी येत आहेत. भजनी दिंड्यांमधील वारकरी भाविकांनी श्रीच्या समाधी मंदिराचे दर्शनासाठी ७ व ८ फेब्रुवारी रोजी श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले राहिलं.

# आज मतदान अन् सोमवारी मतमोजणी

## जि.प., पं.स. निवडणूक ; कुठे-कुठे ईव्हीएम बंद तर कोठे वाद



प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत येणाऱ्या १२५ पंचायत समितीसाठी मतदान प्रक्रिया पार पडत आहे. मोठ्या उत्साहात मतदानाला सुरुवात झाली आहे. शनिवारी सकाळी ७.३० वाजल्यापासूनच मतदान केंद्रांवर मतदारांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहेत. मात्र, सकाळच्या सत्रापासूनच राज्याच्या विविध भागांतून ईव्हीएम मशीनमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती समोर येत आहेत. रायगड, सोलापूर, सातारा आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये मशीन बंद पडल्याने मतदारांना तासनतास ताटकळत उभे राहावे लागले. तर काही ठिकाणी वादाचे प्रसंगही उद्भवले.

छत्रपती संभाजीनगर येथील बिडकीन मतदान केंद्रावर पोलीस आणि उमेदवार प्रतिनिधी यांच्यात शाब्दिक चकमक झाली. विनाकाम महिला गर्दी करत असल्याने पोलिसांनी महिलांना बाहेर काढले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील नानेगाव मतदान केंद्रावर आज मतदानादरम्यान मोठा राडा झाला. भाजपचे अंभई गटाचे उमेदवार त्रिंबक पाटील गव्हाणे यांना अब्दुल सत्तार यांच्या कार्यकर्त्यांकडून धक्काबुक्की झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर नानेगाव परिसरात तणावाचे वातावरण असून परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलीस प्रशासनाला पाचारण करण्यात आले आहे.



जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी काटेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. राज्यातील सर्व नागरिकांना उज्ज्वल भविष्यासाठी लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेऊन मतदान करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# मुंबई महानगर पालिका: महापौर रितु तावडे तर उपमहापौर साठी संजय घाडी यांची घोषणा



प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**मुंबई :** मुंबई महानगरपालिकेचा महापौर कोण? याबाबतची उत्सुकता संपली असून, महापौरपदासाठी भाजपच्या रितू तावडे तर उपमहापौर पदासाठी शिंदे सेनेचे संजय घाडी यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असल्याची घोषणा अमित साटम यांनी केली. हे उपमहापौरपद पुढील सव्वा वर्षासाठी असेल, असेही शिवसेनेने आताच स्पष्ट केले आहे.

मुंबईचे महापौरपद खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारासाठी राखीव असल्याने मुंबईला पुन्हा महिला महापौर मिळणार, हे स्पष्ट होतं. संख्याबळ पाहता महायुतीच्या महापौर-उपमहापौर पदाच्या उमेदवारांचा विजय निश्चित मानला जात आहे. शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपमहापौर या पदासाठी शिवसेना भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून संजय शंकर घाडी यांचे नाव जाहीर करण्यात येत आहे. सदर उपमहापौर पद सव्वा वर्षाकरिता असेल.

# सायबर फसवणूक झाल्यास मिळणार २५ हजार रुपये!

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**मुंबई:** देशातील सायबर व डिजिटल फसवणुकीच्या वाढत्या प्रमाणाची दखल घेत भारतीय रिझर्व्ह बँकेने ग्राहकांच्या अर्थसुरक्षेसाठी काही विशेष उपाय योजण्याचे ठरवले आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी शुक्रवारी या उपायांची माहिती दिली. सायबर फसवणुकीमुळे गमावलेल्या रकमेच्या ८५ टक्के रक्कम अथवा २५ हजार रुपये यातील कमी रक्कम संबंधित ग्राहकास भरपाईपोटी देण्याचे प्रस्तावित आहे. 'कमी रकमेचे व्यवहार करताना झालेल्या डिजिटल फसवणुकीच्या प्रकरणात संबंधित ग्राहकांना ही भरपाई फक्त एकदाच देण्यात येईल', असे मल्होत्रा यांनी सांगितले. ग्राहकांनी इतरांच्या चुकांपासून शिकणे रिझर्व्ह बँकेला अभिप्रेत आहे. तरीही एखाद्या ग्राहकाची डिजिटल व्यवहारात प्रथमच फसवणूक झाल्यास त्या रकमेतील ७० टक्के रकमेची भरपाई रिझर्व्ह बँक करेल. उर्वरित ३० टक्के रकमेचा भार हा संबंधित बँक व संबंधित ग्राहक यांच्यावर समप्रमाणात असेल, असेही मल्होत्रा यांनी नमूद केले. सायबर फसवणुकीचे प्रकार वाढत असल्याने ग्राहकांना सतर्क करण्यासाठी रिझर्व्ह बँक एक चर्चापत्रिकाही प्रकाशित करणार आहे. निर्धोक डिजिटल अदायगीसाठी काय उपाययोजना करता येतील याचा त्यात उल्लेख असेल.

# बीजीई सोसायटीच्या भरती प्रक्रियेला उच्च न्यायालयाचा दणका!

## समांतर आरक्षणात चूक, सहायक प्राध्यापकांची भरती प्रक्रिया रद्द

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**नागपूर :** हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याची जबाबदारी विदर्भातील प्रख्यात बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीने गांभीर्याने घेतली नाही, हेच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या निकालातून समोर आले आहे. समांतर आरक्षणात गंभीर चूक केल्याबद्दल उच्च न्यायालयाने थेट ३३ सहायक प्राध्यापकांची संपूर्ण भरती प्रक्रियाच रद्द करीत संस्थेच्या विद्यमान अध्यक्षांच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढले आहेत. न्यायालयाने संस्थेच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढल्याची माहिती याचिकाकर्त्यांचे वकील ॲड. उज्वल देशपांडे यांनी दिली आहे.

अकोल्यातील आरएलटी विज्ञान महाविद्यालय आणि श्री नथमल गोयनका लॉ कॉलेजमधील ही भरती प्रक्रिया म्हणजे नियोजनशून्यता, अहंकार आणि जबाबदारी झटकण्याचा जिवंत नमुना ठरली आहे. न्यायालयाने पुन्हा नव्याने जाहिरात काढून भरती करा, असा स्पष्ट आदेश देत संस्थेच्या निर्णय क्षमतेलाच आव्हान दिले आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, ३१ मार्च २०२५ रोजी झालेल्या कार्यकारी समितीच्या बैठकीतच समांतर आरक्षणातील त्रुटी लेखी स्वरूपात निदर्शनास आणून देण्यात आल्या होत्या. मानद सचिव डॉ. पवन माहेश्वरी यांनी ही बाब स्पष्ट केली असतानाही, 'मी कायद्याचा अभ्यासक आहे, २० वर्षांचा अनुभव आहे, सर्व जबाबदारी माझीच आहे,' असा ठाम दावा निवड समितीचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंह मोहता यांनी केला होता, हे विशेष. या भरतीविरोधात एका सजग अर्जदाराने न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आणि अखेर सत्य बाहेर आले. मात्र, अर्जदार उमेदवारांच्या आयुष्याची ऐन उमेदीची वर्षे वाया गेली, तर प्राध्यापक नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. तसेच हा निकाल म्हणजे केवळ कायदेशीर झटका नाही, तर संस्थेच्या प्रतिष्ठेवर बसलेला जबरदस्त आघात आहे.

### उद्या बीजीईची निवडणूक; सभासदांमध्ये संभ्रम

बीजीई सोसायटीची त्रैवार्षिक निवडणूक रविवार, ८ फेब्रुवारी रोजी होत असून, विद्यमान अध्यक्ष ॲड. एम.जी. मोहता आणि माजी अध्यक्ष डॉ. आर.बी. हेडा यंदा अमोरा-समोर भिडले आहेत. या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात पोहाचला असतानाच भरती प्रक्रिया रद्द झाल्याने आता संस्थेच्या सभासदांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष हे स्वतः निष्णात विधिज्ञ असतानाही चूक झालीच कशी, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे. बीजीई सोसायटीच्या इतिहासात प्रथमच अध्यक्षांच्या या अक्षम्य चुकीमुळे उमेदीच्या काळातच उमेदवारांचे मोठे नुकसान झाल्याचे बोलले जात आहे.

# स्थायी समिती आणि नियुक्त सदस्यांसाठी राजकीय हालचालींना वेग

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अकोला:** महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीचे निकाल लागून बराच काळ लोटला असला, तरी महापालिकेतील सत्तासंघर्ष आणि अंतर्गत राजकारण अजूनही शमलेले नाही. नियमांनुसार, १९ फेब्रुवारीपूर्वी स्थायी समिती आणि नियुक्त सदस्यांची निवड करणे बंधनकारक असल्याने आता राजकीय पक्षांमध्ये मोठी 'जोडतोड' सुरू झाली आहे.

सरकारी राजपत्रात नगरसेवकांच्या नावांची घोषणा १९ जानेवारी रोजी झाली होती. नियमांनुसार, एका महिन्याच्या आत म्हणजे १९ फेब्रुवारी पर्यंत नियुक्त सदस्यांची आणि स्थायी समिती सदस्यांची निवड होणे आवश्यक आहे. भाजप, शिवसेना (ठाकरे गट) आणि वंचित बहुजन आघाडीने आपल्या गटनेत्यांच्या निवडीची प्रक्रिया पूर्ण करून विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव सोपवले आहेत. मात्र, काँग्रेसमध्ये अद्याप एकमत न झाल्याने त्यांच्या गटनेत्याची घोषणा रखडली आहे. १६ सदस्यीय स्थायी समितीला महापालिकेच्या 'तिजोरीची किल्ली' मानले जाते. या समितीवर आणि ८ नियुक्त सदस्यांच्या जागांवर आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणी तीव्र केली आहे. शहराच्या विकास बजेटवर नियंत्रण मिळवण्यासाठी स्थायी समितीवर वर्चस्व असणे महत्त्वाचे आहे. त्यामुळे पडद्यामागे राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला असून, १९ फेब्रुवारीच्या मुदतीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# बारामती पोटनिवडणुकीसाठी वेळापत्रक जाहीर...!

## अजित पवारांची रिक्त जागा भरण्यासाठी हालचालींना वेग

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**बारामती :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील धक्कादायक निधनानंतर रिक्त झालेल्या बारामती विधानसभा मतदारसंघासाठी आता राजकीय हालचालींना वेग आला आहे. या मतदारसंघातील पोटनिवडणूक घेण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने कंबर कसली असून, निवडणुकीपूर्वीची सर्वात महत्त्वाची प्रक्रिया म्हणजेच विशेष संक्षिप्त मतदार यादी पुनरीक्षण कार्यक्रम प्रशासनाकडून अधिकृतपणे जाहीर करण्यात आला आहे.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, ही प्रक्रिया पार पडणार आहे. यानुसार ९ फेब्रुवारी २०२६ रोजी एकत्रित प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. तर ९ ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत नागरिक आपली नावे नोंदवू शकतात किंवा यादीतील त्रुटींबाबत दावे व हरकती सादर करू शकतात. ६ मार्चपर्यंत प्राप्त झालेल्या सर्व हरकतींची छाननी करून त्या निकाली काढण्याची अंतिम मुदत देण्यात आली आहे. तर १० मार्च रोजी बारामती मतदारसंघाची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. ही अंतिम यादी प्रसिद्ध झाल्यानंतरच बारामतीमध्ये प्रत्यक्ष मतदानाची तारीख जाहीर होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून बारामतीकर अजित पवार यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देत होते. मात्र त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या आणि बारामतीच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली. दुसरीकडे आता सुनेत्रा पवार यांनी बारामती विधानसभेची पोटनिवडणूकही लढवावी अशी मागणी केली जात आहे.



सिटी न्यूज अमरावती
शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# धारणीत ८ फेब्रुवारीला विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा

**अमरावती:** मेळघाटातील दुर्गम आणि वंचित भागातील नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि त्यांना विविध शासकीय योजनांशी जोडण्यासाठी येत्या ८ फेब्रुवारी २०२६ रोजी धारणी येथे 'विधी सेवा महाशिबीर व शासकीय योजनांचा महामेळावा' आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण (नवी दिल्ली) आणि महाराष्ट्र राज्य विधी सेवा (मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा जिल्हा परिषद शाळेच्या मैदानात पार पडणार आहे. या महामेळाव्याला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायमूर्ती अनिल किलोर आणि अमरावती जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती प्रविण पाटील यांची उपस्थित राहतील. या महामेळाव्याचा मुख्य उद्देश समाजातील दुर्बल घटक, कामगार, दिव्यांग आणि महिलांना विधी सेवा प्राधिकरणाच्या योजनांची माहिती देणे आणि त्यांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे हा आहे. शिबिरामध्ये तज्ज्ञ कायदेतज्ज्ञांमार्फत मोफत कायदेशीर सल्ला दिला जाईल.

# तपस्याधाम रिट्रीट सेंटरचा भूमिपूजन आणि उद्घाटन समारंभ

## अमरावतीमध्ये भव्य उद्घाटन समारंभ संपन्न

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी




**अमरावती :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, अमरावतीच्या वतीने, हनुमान गढी, इंद्रेश्वर मंदिर संकुल जवळ बांधण्यात येत असलेल्या तपस्याधाम रिट्रीट सेंटरचा भूमिपूजन आणि उद्घाटन समारंभ आज सकाळी १० वाजता अतिशय आनंदी आणि आध्यात्मिक वातावरणात पार पडला.

या शुभ प्रसंगी, प्रमुख पाहुण्यांमध्ये आमदार रवि राणा, आमदार राजेश वानखेडे, त्यांच्या पत्नी आरती वानखेडे, श्रद्धा दांडगे, आंतरराष्ट्रीय वक्ते आणि प्रसिद्ध वैद्य डॉ. सचिनभाई परब, उद्योजक चंद्रकुमार जाजोदिया आणि इतर अनेक मान्यवर होते.ङ

सर्व पाहुण्यांच्या हस्ते केंद्राची पायाभरणी करण्यात आली.

या कार्यक्रमाला अमरावती जिल्हा आणि परिसरातील ब्रह्माकुमारी कुटुंबातील सदस्य, सेवाभावी नागरिक आणि सर्व प्रमुख माध्यम प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी, राजयोगिनी ब्रह्मकुमारी सीता दीदी यांनी तपस्याधाम रिट्रीट सेंटरचे उद्दिष्ट मांडताना सांगितले की, येणाऱ्या काळात हे सेंटर मानवी आत्म्याला खरा आनंद, शांती आणि आंतरिक सक्षमीकरण प्रदान करणारे एक प्रमुख केंद्र बनेल. आधुनिक जीवनातील तणावपूर्ण परिस्थितीत, हे रिट्रीट सेंटर आध्यात्मिक उन्नतीसाठी एक शक्तिशाली माध्यम ठरेल.

कार्यक्रमाला संबोधित करताना, डॉ. सचिनभाई परब यांनी ब्रह्मकुमारी संघटनेच्या जागतिक कार्यावर प्रकाश टाकताना सांगितले की, आज ब्रह्मकुमारी संघटना आध्यात्मिक जागृती, सामाजिक उभारणी आणि मानवी मूल्यांच्या उन्नतीसाठी १५० हून अधिक देशांमध्ये काम करत आहे. तपस्याधाम रिट्रीट सेंटर अनेक आत्म्यांना खरा आनंद आणि खरी शांती प्रदान करण्याचे साधन देखील बनेल.

आमदार राजेशजी वानखेडे यांनी आपल्या भाषणात हनुमान गढी परिसर भविष्यात एक महत्त्वाचे आध्यात्मिक तीर्थस्थळ म्हणून विकसित करण्याबद्दल सांगितले आणि ब्रह्माकुमारी कुटुंबाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

सदस्य रवि राणा यांनी भावनिकपणे सांगितले, ठब्रह्माकुमारी माझे कुटुंब आहेत. आदरणीय दीदी मातांसारख्या आहेत आणि हे काम माझे स्वतःचे आहे.ठङ त्यांनी तात्काळ त्यांच्या अधिकाऱ्यांना बोलावून बांधकाम कामाशी संबंधित सर्व आवश्यक मदत करण्याचे निर्देश दिले आणि पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. अमरावती येथील प्रसिद्ध संत सुधीर महाराज देशमुख हे देखील या कार्यक्रमात उपस्थित होते. त्यांनी या आध्यात्मिक बांधकामासाठी शुभेच्छा दिल्या आणि आळंदीमध्ये प्रस्तावित भव्य बांधकाम प्रकल्पाची माहिती देताना तेथील प्रस्तावित साहित्य विभागात ब्रह्माकुमारी शिक्षकांचे योगदान देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात बी.के. प्रमोद भाई यांनी सादर केलेल्या मधुर आध्यात्मिक गीताने झाली, ज्यामुळे अत्यंत भावनिक वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे सुंदर आणि सुरेख संयोजन बी.के. सुनंदा दीदी यांनी केले. या भव्य कार्यक्रमासह, तपस्याधाम रिट्रीट सेंटरचे बांधकाम सुरू झाले आहे. उपस्थित सर्व मान्यवरांनी एकमताने ही सेवा समाजासाठी महत्त्वाची असल्याचे घोषित केले आणि ती लवकर पूर्ण व्हावी अशी शुभेच्छा दिल्या.

# स्पर्धा परीक्षेत सातत्य, शिस्त महत्वाची

## अधिकाऱ्यांचा स्पर्धा परीक्षा शिबीरात मार्गदर्शन

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी



**अमरावती :** राज्य आणि केंद्र स्तरावरील स्पर्धा परीक्षांसाठी अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी पुस्तके आणि माहितीचे स्त्रोत विचारपूर्वक निवडणे गरजेचे आहे. तसेच स्पर्धा परीक्षेतील यशासाठी सातत्य आणि शिस्त महत्वाची असल्याचे मत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीरात व्यक्त केले.

जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हा प्रशासनाच्या वतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले. यात भारतीय पोलिस सेवेतील सागर भामरे आणि भारतीय वन सेवेतील प्रांजल चोपडे यांनी मार्गदर्शन केले.

श्री. भामरे यांनी अखिल भारतीय सेवेतील परीक्षा उत्तीर्ण होण्यात ग्रामीण आणि शहरी भागातील सर्व स्तरातील विद्यार्थी यशस्वी होऊ शकतात. मात्र स्पर्धा परीक्षांची तयारी करताना पर्यायी मार्गही शोधणे आवश्यक आहे. या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी निश्चित कालावधी आहे. त्यामुळे परीक्षा देण्याआधी पूर्ण अभ्यासक्रम जाणून घेणे आवश्यक आहे. यासाठी परीक्षेच्या जाहिरातीमध्ये देण्यात आलेला अभ्यासक्रम आणि मागील वर्षीच्या पेपरमधील प्रश्नावली महत्वाचे आहेत. तसेच पर्यायी विषय निवडताना अभ्यासक्रमाची उपलब्धता आणि मार्गदर्शन महत्वाचे आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करताना आपली वैयक्तिकरित्या आपली बलस्थाने आणि कमजोरी लक्षात घेऊन तयारी करावी. यासोबतच चालू घडामोडीसाठी वृत्तपत्र आणि मासिकांचा आधार घेणे आवश्यक आहे.

श्री. चोपडे यांनी पर्यायी विषय निवडताना काळजीपूर्वक निवडावे. आवश्यकता भासल्यास विषय बदलवावा. परीक्षांमध्ये यश मिळविण्यासाठी दररोज सात ते आठ तास अभ्यास करणे आवश्यक आहे. यातही दर्जेदार अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यासोबतच मॉक टेस्टला समोर जाणे आवश्यक आहे. यामुळे परीक्षा पद्धती समजून घेण्यास मदत होईल. परीक्षांमध्ये लेखनाचा सराव होणे आवश्यक आहे. यात गतीने प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत.

# ट्रकच्या धडकेत दोन गायींचा मृत्यू

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी



**खामगाव:** अज्ञात ट्रकच्या धडकेत दोन गायींचा जागीच मृत्यू झाला, तर एक गाय गंभीर जखमी झाली. ही घटना खामगाव-अकोला रस्त्यावरील टेंभुर्णा फाट्याजवळ सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास घडली. अपघातानंतर ट्रकचालकाने घटनास्थळावरून पलायन केले.

मिळालेल्या माहितीनुसार, काही गुरे रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने त्यांना चिरडले. या अपघातात दोन गायींचा जागीच मृत्यू झाला, तर एक गाय गंभीर जखमी झाली. घटनेची माहिती मिळताच एकनिष्ठा गौसेवा व रक्तसेवा फाउंडेशनचे गौसेवक सूरज यादव यांच्यासह अमोल तायडे, मनोज यादव, विरेंद्र पिल्ले, यश येळवे, दर्शन भगत, अर्पण यादव, शुभम माकोडे, गणेश सोसे, वैभव पवार, अंकुश माकोडे व गोविंद यादव यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी मृत गायी रस्त्याच्या कडेला हलविल्या, तसेच गंभीर जखमी गायीला मालक गणेश चौकसे यांच्या शेतात नेऊन तेथे उपचार सुरु केले आहेत.

# जिल्ह्यात १८ फेब्रुवारीला तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम

## नागरिकांनी आपल्या समस्या व प्रलंबित कामांबाबत या सुविधेचा लाभ घेण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अमरावती:** पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे महोदयांच्या निर्देशानुसार नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आणि 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' प्रभावीपणे राबवण्यासाठी येत्या बुधवार, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये 'तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी या संदर्भात आदेश निर्गमित केले असून, प्रत्येक तालुक्यासाठी वरिष्ठ समन्वयक अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.

या कार्यक्रमात नागरिकांच्या वैयक्तिक व सार्वजनिक तक्रारी, विविध विकासकामांची सद्यस्थिती, प्रलंबित प्रस्ताव आणि स्थानिक पातळीवरील महत्वाच्या प्रश्नांचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. या दिवशी तहसील स्तरावर जिल्हा परिषद तसेच संबंधित तालुक्यातील सर्व विभागांचे अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसचिव आणि कृषी सहाय्यक यांची उपस्थिती राहणार आहे.

तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रमासाठी समन्वयक अधिकारी प्रशासनाने तालुकानिहाय जबाबदारी सोपवली असून उपस्थितीत तालुकास्तरीय जनसंवाद व तक्रार निवारण कार्यक्रम घेण्यासाठी खालीलप्रमाणे समन्वयक अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे. अचलपूर तालूक्यातील उपजिल्हाधिकारी महसूल विवेक जाधव, प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, तहसिलदार सुदर्शन सहारे, दर्यापूर तालुक्यातील उपजिल्हाधिकारी निवडणूक शिवाजी शिंदे, उपमुकाअ बाळासाहेब रायबोले, तहसिलदार रविंद्र कानडजे, अमरावती जिल्ह्यातील जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, उपमुकाअ श्रीराम कुळकर्णी, तहसिलदार विजय लोखंडे, धारणी तालुक्यातील उपजिल्हाधिकारी रोहयो ज्ञानेश्वर घ्यार, कार्यकारी अधिकारी सुनिल जाधव, तहसिलदार प्रदिप शेवाळे, भातकुली तालुक्यातील उपजिल्हाधिकारी पुनर्वसन श्रध्दा उदावंत, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी शिल्पा पवार, तहसिलदार अक्षय मंडवे, चांदुर रेल्वे तालुक्यातील उपजिल्हाधिकारी प्रसन्नजीत चव्हाण, कृषी विकास अधिकारी मल्ला तोडकर, तहसिलदार पुजा माटोडे, मोर्शी तालुक्यातील उपजिल्हाधिकारी भूसंपादन सुषमा चौधरी, शिक्षणाधिकारी माध्यमिक प्रिया देशमुख, तहसिलदार सागर ढवळे, वरूड तालुक्यातील उपविभागाय अधिकारी प्रदीप पवार, शिक्षणाधिकारी प्राथमिक सतीश मुगल, तहसिलदार रामदास शेळके, चांदुर बाजार तालुक्यातील उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, जिल्हा आरोग्य अधिकारी प्रविण पारिसे, तहसिलदार मनोज सोनारकर, तहसिलदार पुष्पा सोळंके हे समन्वयक म्हणून कामकाज पाहणार आहेत.

# बदलत्या हवामानातील शेतीसाठी 'पोकरा' बाबत १३ फेब्रुवारीला विशेष वेबिनार

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अमरावती :** महाराष्ट्र राज्यातील निम्म्याहून अधिक लोकसंख्या शेतीवर अवलंबून असून, राज्याच्या आर्थिक विकासामध्ये कृषी उत्पन्नाचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. मात्र, मागील दशकापासून हवामानात होणाऱ्या जलद बदलांमुळे शेतीवर प्रतिकूल परिणाम होत असून पिकांच्या उत्पादनात मोठी घट आणि अनिश्चितता दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी राज्य शासनाने जागतिक बँकेच्या सहकार्याने 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प २.०' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राज्याच्या २१ जिल्ह्यांत राबविण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यात या प्रकल्पांतर्गत एकूण ४५४ गावांमध्ये अंमलबजावणी केली जात असून, हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी कृषी विभागामार्फत विशेष प्रयत्न केले जात आहेत.

याचाच एक भाग म्हणून, शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२:३० या वेळेत 'लागवडपूर्व तंत्र, हमखास यशाचा मंत्र' या विषयावर एका विशेष वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे. या वेबिनारमध्ये बदलत्या हवामानानुसार शेतीमध्ये कोणते बदल करावेत, नैसर्गिक आपत्तींमधील जोखीम कशी कमी करावी आणि कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन कसे घ्यावे, यावर तज्ज्ञांकडून मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच, योग्य पेरणी पद्धती, बियाण्यांची निवड आणि आधुनिक यंत्रसामग्रीच्या वापराबाबतही सविस्तर माहिती दिली जाईल.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधव, भगिनी, कृषिताई, महिला शेतकरी बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या सभासदांना या वेबिनारचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. सर्वांनी गटामध्ये एकत्र बसून प्रकल्पाच्या अधिकृत भ्दल्ऊलं चॅनेलवर किंवा https://www.youtueb.com/@PoCRAMaharashtra या लिंकवर हा वेबिनार नक्की पहावा. अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

# एमडी ड्रग्सबाबत कारवाई करावी- जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अमरावती :** महसूल गुप्तचर संचालनालयाने पाच किलो एमडी ड्रग्स पकडून कार्यवाही केली आहे. शहराच्या दृष्टीने ही धोक्याची घंटा आहे. अंमली पदार्थांच्या दुष्परिणामाबाबत प्रामुख्याने युवकांमध्ये जनजागृती करावी, तसेच स्थानिक पोलिस यंत्रणांनी संपर्क वाढवून एमडी ड्रग्सबाबत कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात नार्को को-ऑर्डिनेशन सेंटर जिल्हास्तरीय समितीची मासिक सभा पार पडली. यावेळी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक किरण वानखेडे यांनी अंमली पदार्थाबाबत माहिती दिली. अंमली पदार्थाबाबत प्रामुख्याने किशोरवयीन मुले लक्ष्य होत असल्याने त्यांच्यामध्ये जनजागृतीसाठी व्याख्याने आयोजित करण्यात यावे. येत्या १५ दिवसात समाज कल्याणमधील सर्व वसतिगृहे आणि शाळांमध्ये ही व्याख्याने आयोजित करण्यात यावीत. आऊटरिच कार्यक्रम राबवून समाजात जनजागृती करण्यात यावी. यासाठी एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे. 'नशामुक्त भारत, खुशहाल भारत' या टॅगलाईनला अनुसरून व्यापक जनजागृती करावी.

अंमली पदार्थामुळे समाजावर दुष्परिणाम होणार आहे. त्यामुळे पोलिसांनी संपर्क वाढवून सातत्याने कारवाई करावी. अमरावती येथील कारवाईच्या अनुषंगाने पोलिसांनी बंद घरे, फ्लॅट यांच्यावर निगराणी ठेऊन गोपनीय पोलिस यंत्रणा सतर्क करावी. आवश्यकता पडल्यास अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्यांवर तडीपारीची कारवाई प्रस्तावित करावी. तसेच अन्न व औषधी प्रशासन विभागाने रासायनिक कारखान्यांमध्ये अंमली पदार्थांचे उत्पादन होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रामख्याने औद्योगिक परिसरातील बंद कारखान्यात अंमली पदार्थांची निर्मिती होत असल्याचे काही ठिकाणी लक्षात आल्याने अशा परिसरावर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिल्या.

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात 'पीसीबी डिझायनिंग' वर कार्यशाळा संपन्न

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अमरावती:** इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी क्षेत्रात पीसीबीचे व्यावहारिक प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. हे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता, वास्तविक जगातील इलेक्ट्रॉनिक उत्पादने कशी बनतात हे समजण्यास मदत करते. हीच गरज ओळखून येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन विभागातर्फे नुकतेच 'पीसीबी डिझायनिंग' या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

स्मार्टफोनपासून ते वैद्यकीय उपकरणांपर्यंत सर्व गॅझेट्समध्ये पीसीबी हा त्यांचा पाया असतो. या कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना पीसीबी बोर्डसाठी आवश्यक मूलभूत साहित्य, इलेक्ट्रॉनिक्स घटक आणि त्यांची वैशिष्ट्ये, तसेच आधुनिक सॉफ्टवेअरमध्ये स्किमॅटिक आणि लेआउट डिझाइन करण्याची सविस्तर माहिती देण्यात आली. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना तांत्रिक संकल्पनांवर आधारित 'हँड्स-ऑन' ट्रेनिंगही देण्यात आले. या उपक्रमात तृतीय वर्षातील ७० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

या प्रशिक्षणादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध उद्योगांमध्ये वापरल्या जाणाऱ्या जागतिक दर्जाच्या सॉफ्टवेअरवर प्रत्यक्ष काम करण्याची संधी मिळविली. विभागप्रमुख पी. आर. देशमुख यांनी या प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, अशा कार्यशाळांमुळे विद्यार्थी उद्योगांच्या गरजांनुसार तयार होतात. आजच्या काळात ऑटोमोटिव्ह, एरोस्पेस आणि दूरसंचार क्षेत्रात कुशल पीसीबी डिझायनर्सना मोठी मागणी आहे.

# तृतीयपंथीयांना तक्रार नोंदविण्यासाठी हेल्पलाईन

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अमरावती:** तृतीयपंथीयांना तक्रार नोंदविण्यासाठी हेल्पलाईन सुरू करण्यात आली. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

केंद्र शासनाने ट्रान्सजेंडर व्यक्ती हक्काचे संरक्षण कायदा २०१९ व नियम २०२० संपूर्ण देशात लागू झाला आहे. त्याअनुषंगाने तृतीयपंथीय समाजातील व्यक्तींसाठी केंद्र शासनातर्फे स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले आहे. या पोर्टलवर तृतीयपंथीयांसाठी १४४२७ हा राष्ट्रीय हेल्पलाईन क्रमांक जाहिर करण्यात आला आहे. या हेल्पलाईन क्रमांकाद्वारे तृतीयपंथीय व्यक्तींना योजनांची माहिती, अर्ज प्रक्रिया संबंधित मार्गदर्शन, अडचणीचे निराकरण, तसेच तक्रारी नोंदविण्यासाठी केंद्र शासनाची तृतीयपंथीय हेल्पलाईन सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. गरजूंनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याणच्या प्रादेशिक उपायुक्त माया केदार, सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांनी केले आहे.

# 'पालवी' जिल्हास्तरीय प्रकल्पाचा प्रारंभ

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अमरावती:** जिल्ह्यातील अंगणवाड्यांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी जिल्हा परिषद, आणि 'क्वेस्ट' संस्थेच्या वतीने 'पालवी' या जिल्हास्तरीय प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला. नुकतेच या तीन वर्षांच्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाची घोषणा करण्यात आली. या प्रकल्पास टाटा ट्रस्ट आणि मोटिवेशन फॉर एक्सलन्स यांचे आर्थिक सहकार्य लाभले आहे.

या प्रकल्पाचे स्वरूप त्रिसूत्रीवर आधारित आहे. पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील १३ तालुक्यांमधील सर्व अंगणवाडी सेविकांना सहा-स्तरीय विशेष प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष कामात ऑनसाइट सपोर्ट दिला जाणार आहे. दुसऱ्या महत्त्वाच्या घटकांतर्गत धारणी आणि चिखलदरा या आदिवासी पट्ट्यात 'बहुभाषिक शिक्षण' राबविले जाईल. यात कोरकू भाषिक मुलांच्या घरच्या भाषेचा वापर करून त्यांना मराठी माध्यमात शिकण्यास सक्षम केले जाणार आहे. तिसऱ्या घटकात तिवसा तालुक्यातील ७५ शाळांमध्ये इयत्ता पहिली व दुसरीसाठी 'पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान' उपक्रम राबवण्यात येणार आहे.

उद्घाटन प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी या प्रकल्पाला प्रशासकीय स्तरावर पूर्ण पाठबळ देण्याचे आश्वासन दिले. त्या म्हणाल्या, अंगणवाडी ते प्राथमिक शाळा असा सलग शिक्षणप्रवाह निर्माण होणे गरजेचे आहे. या अंतर्गत १८८ मॉडेल अंगणवाड्या विकसित केल्या जाणार असून, ग्रामपंचायतींच्या मदतीने भौतिक सुविधा आणि शैक्षणिक साहित्य पुरवले जाईल. यावेळी 'गोष्टरंग' टीमने सादर केलेल्या नाटकाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. कार्यक्रमाला विलास मरसाळे, नितीन विशे, मिताली थत्ते आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# आता लाडकी बहीण योजनेसाठी आधार प्रमाणीकरण

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अमरावती :** राज्यातील महिलांच्या आधिक स्वातंत्र्य, तसेच आरोग्य, पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यामाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहोण योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पात्र लाभाची महिलांची पडताळणी आणि प्रमाणीकरण करण्यासाठी ई-केवायसी माध्यमातून आधार प्रमाणीकरण करण्यात मान्यता देण्यात आली आहे.

योजनेतील लाभार्थ्यांची १८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी करणे आवश्यक होते. ऑनलाईन ई-केवायसी करताना पतीचे किंवा वडिलांचे आधार कार्ड नोंदवून ओटीपी प्राप्त झाल्यानंतर ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण होत होती. परंतु विधवा, परितत्त्या, कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिला, घटस्फोटीत, एकल व ज्यांचे वडील मृत्यू पावले आहेत, अशा महिलांना ई-केवायसी करण्यात अडचण निर्माण होत होती. त्यामुळे ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदत वाढवून ई-केवायसी प्रक्रिया राबवित असताना लाभार्थ्यांकडून पर्याय निवडताना संभ्रम असल्यामुळे ई-केवायसी करताना चुका झाल्यास किंवा पती किंवा वडील ह्यात नसलेल्या, तसेच घटस्फोटीत लाभार्थांची ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण करण्यासाठी किंवा अद्याप ई-केवायसी प्रक्रीया पूर्ण केली नसल्यास यासाठी एडीट ऑप्शन देण्यात आला होता.

१८ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन ई-केवायसी करताना पर्याय देण्यात आले होते. यात माझ्या कुटुंबातील सदस्य नियमित कायम कर्मचारी माणून सरकारी विभाग, उपक्रम, मंडळ, भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत नाही किंवा सेवानंतर निवृत्तीवेतन येत नाहीत. पर्याय : होय/नाही, माझ्या कुटुंबातील केवळ एक विवाहीत व एक अविवाहीत महिला योजनेचा लाभ घेत आहे. पर्याय होय / नाही, या पर्यायापैकी लाभार्थ्यांनी नाही हा पर्याय निवडल्यामुळे लाभार्थ्यांचे अर्जामध्ये रिमार्क ख्ःिष्ण्उदर्न्स्ज्१ आणि स्टेटस रिजेक्ट दाखवत आहे. त्यामुळे अर्जदाराचे लाभ बंद झाले आहेत.

लाभार्थ्यांनी ऑनलाईन स्टेटस तपासणी करावयाची असल्यास सेतू केंद्र, सायबर कॅफे, बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, पंचायत समिती, संबंधीत तालुका, बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी प्रकल्प किंवा जिल्हा महिला व बाल अधिकारी, अमरावती येथे तपासणी करु शकतील. त्यासाठी केवळ जिल्हास्तरावरील कार्यालयात येणाची आवश्यकता नाही. याबाबत ई-केवायसी प्रक्रीया पुन्हा करण्यासाठी एडीट ऑप्शन पुन्हा उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे, असे जिल्हा महिला व बाल अधिकारी अतुल भडांगे यांनी कळविले आहे.

सिटी न्यूज अकोला
शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## बांधकाम नियंत्रण समितीवर श्याम राऊत

**कुटासा:** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या नियंत्रण समितीवर येथील श्याम गजानन राऊत यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीमुळे अकोला जिल्ह्याला मंडळाच्या कार्यात प्रतिनिधित्व मिळाले आहे.

नियंत्रण समितीच्या अध्यक्षपदी आमदार रणधीर सावरकर यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या नेतृत्वाखाली समिती कार्यरत राहणार आहे. समितीमार्फत



राज्यातील इमारत व बांधकाम क्षेत्रातील कामगारांच्या कल्याणकारी योजना, सुविधा, सुरक्षा उपाययोजना तसेच विविध शासकीय लाभ योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर दिला जाणार आहे.

# धरण असूनही तालुकावासी तहानलेले ?

## पाणी समस्या सुटणार कधी

विशाल नांदोकार ७ फेब्रुवारी

**तेल्हारा:** तेल्हारा तालुक्यात वान धरण अस्तित्वात असतानाही आजही जनतेला पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे, ही बाब आता केवळ दुर्दैव न राहता प्रशासनिक अपयशाचा जिवंत पुरावा ठरत आहे. यापूर्वीही वारी भैरवगड परिसरातील वान धरणाच्या पाण्यावरून तीव्र टंचाईची स्थिती निर्माण झाल्याची वास्तववादी बातमी 'दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट' ने प्रसिद्ध केली होती. त्या बातमीनंतरही आज परिस्थितीत फारसा बदल झालेला नाही, उलट प्रश्न अधिक गंभीर झाला आहे.

तेल्हारा तालुक्यातील ३४ पेक्षा अधिक गावांमध्ये पाणीटंचाई कायम असून, नागरिकांना दूषित व अपुऱ्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत



आहे. या दूषित पाण्यामुळे किडनी, त्वचारोग, पोटाचे आजार वाढत असल्याचे वास्तव वारंवार समोर आले आहे. तरीही 'धरण आहे, पण पाणी नाही' ही विसंगती आजही तशीच आहे.

विशेष म्हणजे, याच वान धरणाच्या पाण्यावर आधारित बाळापूर ६९ खेडी पाणीपुरवठा योजना मात्र वेगाने पुढे नेली जात आहे. सध्या बाळापूरला प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू नसला, तरी जलशुद्धीकरण केंद्र व पाइपलाइनचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र तेल्हारा तालुक्यातील मंजूर गावांसाठी पाणीपुरवठ्याबाबत साधी नियोजनात्मक हालचालसुद्धा दिसून येत नाही, ही बाब स्थानिकांमध्ये असंतोष निर्माण करणारी आहे.

याच पार्श्वभूमीवर नागरिक विचारत आहेत - 'वान धरण तेल्हाऱ्यातील शेतकरी व नागरिकांसाठी आहे की बाळापूरसाठीच?'

पूर्वी वान धरणाच्या पाण्यासाठी अनेक गावांसाठी स्वतंत्र योजना प्रस्तावित करण्यात आल्या, कोट्यवधी रुपयांची कामे कागदावर दाखवण्यात आली; मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी टाक्या अर्धवट, पाइपलाइन अपूर्ण आणि योजना अडकलेल्या अवस्थेत आहेत. दुसरीकडे, शासन निर्णय व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या आदेशांचे उल्लंघन करून काही ठिकाणी कामे सुरू असल्याचा आरोप शेतकरी व नागरिक करत आहेत.

या संपूर्ण प्रकरणात लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकाऱ्यांचे मौन अधिकच संशयास्पद ठरत आहे. तहसीलदारांनी निवेदन स्वीकारूनही पुढील कारवाई न होणे, यामुळे 'निवेदन म्हणजे केवळ कागदाचा ढीग आहे का?' असा सवाल उपस्थित होत आहे.

तेल्हारा तालुक्यातील शेतकरी आता फक्त पिण्याचे पाणी नव्हे, तर सिंचनासाठी हक्काचे पाणी मागत आहेत. 'आमच्या जमिनी कोरड्या, धरण भरलेले; हे गणितच चुकीचे आहे,' अशी भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.

आज प्रश्न पाण्याचा नाही, तर न्यायाचा आहे.

आज तेल्हारा शांत आहे, पण उद्या हा प्रश्न धरणे आंदोलनात बदलला, तर त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींवर असेल, असा स्पष्ट इशारा शेतकरी व नागरिकांकडून दिला जात आहे.

## धाबेकर नगराच्या कीर्तन उत्सवात हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे कीर्तन संपन्न



**अकोला:** खडकी परिसरातील धाबेकर नगरात संत गजानन महाराज प्रगटदिन महोत्सव निमित्त संत गजानन महाराज चॅरीटेबल ट्रस्ट धाबेकर नगरच्या वतीने आयोजित कीर्तन उत्सवात गुरुवारी वारी भैरवगड येथील कीर्तनकार ज्ञानेश्वर महाराज वाघ यांची पंचम किर्तन सेवा संपन्न झाली.आपल्या ओजस्वी व धीरगंभीर वाणीने हभप वाघ महाराज यांनी वारकरी संप्रदायाची महती व संतांची गाथा सांगितली. जीवनाचे मूल्य ठरविताना कोणत्या चाकोरीतून मार्गक्रमण करून या जगात येणाचे सार्थक करावे याचे सूत्र प्रतिपादित केले.कीर्तन प्रारंभी समितीच्या वतीने हभप ज्ञानेश्वर महाराज वाघ यांचे स्वागत करण्यात आले.किर्तन उत्सवात आज शनिवार.दि. ७ फेब्रुवारीला मुंबईचे हभप चकोर महाराज बाविस्कर यांचे कीर्तन होणार आहे.तसेच दुपारी ४ वाजता कथास्थळ पासून परिसरात श्रींची पालखी शोभायात्रा निघणार आहे.उद्या दि ८ फेब्रुवारी रोजी संत गजानन महाराजांचा प्रगटदिन उत्सव असुन सकाळी १० वाजता हभप भागवत महाराज देशमुख यांचे काल्याचे कीर्तन व महाआरती होणार आहे, रात्री ७ वाजता दरबार गजानन हे संगीतमय संत गजानन महाराज नाट्याचे सादरीकरण होऊन या महोत्सवाचे समापन होईल. परिसरातील सर्व भक्तांनी या उत्सवाचा लाभ घेण्याचे आवाहन संत गजानन महाराज चॅरीटेबल ट्रस्ट धाबेकर नगर व खडकी बु. च्या समस्त नागरिकांकडून करण्यात आले आहे.

## वैभव फुलाडी उत्कृष्ट कर्मचारी पुरस्काराने सन्मानित




प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अकोला:** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील शाखाधिकारी वैभव फुलाडी यांना योगतज्ञ श्री विठ्ठल राव जिभकाटे 'उत्कृष्ट कर्मचारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. २०२४ २५ वर्षाकरिता हा पुरस्कार होता. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या चाळीसाव्या दीक्षांत समारोहात मान्यवरांच्या हस्ते त्यांना उत्कृष्ट कर्मचारी पुरस्कार बहाल करण्यात आला आहे. वैभव फुलाडी उच्च विद्या विभूषित असून, संपूर्ण कृषी विद्यापीठात उत्कृष्ट, अभ्यासू व स्वच्छ प्रतिमेचे अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. मागील अनेक वर्षापासून डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात कार्यरत असणारे वैभव फुलाडी लोकप्रिय कर्मचारी म्हणून ओळखले जातात. प्रत्येकाला मदत करणे व आपल्या कामाप्रती असणारी निष्ठा ही त्यांची जमेची बाजू आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्कारामुळे संपूर्ण कृषी विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## नव्या युगाचे प्रवर्तक क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले पुस्तकाचे डॉ. दामोदर खडसे यांच्या हस्ते प्रकाशन



प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अकोला :** नव्या युगाचे प्रवर्तक क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले पुस्तकाचे प्रकाशन प्रसिद्ध लेखक अनुवादक डॉ. दामोदर खडसे यांच्या हस्ते झाले. वीर बाजी पासलकर सभागृह, पुणे येथे नुकताच कार्यक्रम झाला.

मोगल जाधव लिखित या पुस्तकाचे प्रकाशन प्रसंगी बालभारती, पुणेच्या इतिहास अभ्यास मंडळाचे प्रमुख डॉ. गणेश राऊत, लेखक लहु गायकवाड उपस्थित होते. डॉ. खडसे यांनी समता, स्वातंत्र्य आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये महात्मा फुले यांचे कार्य अधोरेखित केले. डॉ. गणेश राऊत व डॉ. गायकवाड यांनीही महात्मा फुले यांच्या कार्यावर प्रकाश टाकला.केले. कुमार आहेर यांनी 'मी सत्यशोधक जोतीराव फुले बोलतोय' हा एकपात्री प्रयोग सादर केला. सूत्रसंचालन निवेदिका डॉ. शिवानी लिमये यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. संगीता गांगुर्डे यांनी केले. साहित्यिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर याप्रसंगी उपस्थित होते.

## चित्रपट निर्देशक नीरज पांडे यांच्यावर कारवाई करा




प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अकोला:** सिने निर्देशक नीरज पांडे यांनी घुसखोर पंडत नावाचा सिनेमा बनवून समस्त ब्राह्मण समाजाची चेष्टा केल्याने अकोला जिल्हा अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या वतीने प्रदेश उपाध्यक्ष विजय तिवारी यांचा नेतृत्वात पोलिस अधीक्षक यांना निवेदन दिले.

नीरज पांडे विरुद्ध कायदेशीर कारवाई व्हावी अशी मागणी करण्यात आली. या वेळी जिल्हा अध्यक्ष श्याम कुलकर्णी, संतोष पांडे, राकेश शर्मा, उमंग जोशी, देवेन्द्र तिवारी,अक्षय गंगाखेडकर, डॉ विजय शर्मा, राजेन्द्र जोशी, दिपक चौबे, विष्णुप्रसाद, श्याम पचोरी, दिनेश शर्मा, नितीन शर्मा सह बहुसंख्य ब्रह्म वृंद उपस्थित होते.

## निधन वार्ता

### नलिनी देशपांडे



**अकोला:** अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुभाष देशपांडे यांच्या मातोश्री श्रीमती नलिनी देशपांडे यांचे वयाच्या १०५ व्या वर्षी शुक्रवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्तपरिवार आहे.

### शेवंताबाई आसोले



**अडगाव:** छत्रपती शिवाजी नगर येथील शेवंताबाई शंकरराव आसोले यांचे ४ फेब्रुवारी रोजी निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले आणि मोठा आप्तपरिवार आहे. राजेश आसोले यांच्या त्या मातोश्री होत.

## गावातील म्हस्को माय संस्थानचा जिर्णोद्धार करा; भाविकांची मागणी



प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**हिवरखेड:** गावच्या वेशीवरील म्हस्को माता संस्थान जैसे थे आहे. गावातील लग्न समारंभ शुभ प्रसंगी अगोदर आमंत्रण म्हस्को माताला देतात. विवाह सोहळा चांगल्या प्रकारे व्हावा अशी प्रार्थना केली जाते. दुरून भक्त दर्शनासाठी येतात. संस्थानचा जीर्णोद्धार करावा अशी मागणी केली जात आहे. येथे भाविकांना पिण्याचे पाणी घरूनच सोबत आणावे लागते. रात्रीच्या वेळी येथे लाईट सुद्धा नाही, बॅटरी, टॉर्च, दिवे, सोबत आणावे लागतात.

पावसाळ्यात तर बिकट परिस्थिती आहे, भाविकांनी गैर सोय होऊ नये, व या मंदिराचा जिर्णोद्धार व्हावा अशी मागणी आहे.

## 'कॅट'च्या अकोला शाखेचा पदग्रहण सोहळा संपन्न

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अकोला:** कॉन्फडेरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स अर्थात 'कॅट'च्या अकोला शाखेचा पदग्रहण सोहळा मंगळवारी अग्रसेन भवनात झाला. कॅटचे विदर्भ चेअरपर्सन वसंत बाछुका यांच्या अध्यक्षतेत आयोजित सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून कॅटचे राष्ट्रीय अध्यक्ष बी.सी. भरतीया, आ. रणधीर सावरकर, कॅटचे विदर्भ अध्यक्ष विनोद कलंत्री, राष्ट्रीय सचिव अशोक दालमिया, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य श्याम शर्मा,विदर्भ महामंत्री निकेश गुप्ता,कॅटच्या महिला विभाग अध्यक्ष कुंजन वेद, विदर्भ चेंबरचे सचिव निरव वोरा,कॅट अकोला शाखेचे




अध्यक्ष राहुल गोयनका व कॅटच्या महिला विंग अध्यक्ष दिपाली देशपांडे उपस्थित होते.

सर्वप्रथम राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार व माजी मंत्री राज पुरोहित यांना सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. श्याम शर्मा यांनी कॅटच्या अकोला कार्यकारिणीला शपथ दिली. यावेळी कॅटचे अकोला शाखा अध्यक्ष राहुल गोयनका,उपाध्यक्ष मनोज बिसेन, पंकज कोठारी, राजकुमार राजपाल,सचिव मनीष केडिया,कोषाध्यक्ष सीए दीपक अग्रवाल,सहसचिव राम ठक्कर, शार्दुल दिगंबर, प्रचार मंत्री संतोष छाजेड, अंकेक्षक चंचल भाटी ,जनसंपर्क अधिकारी विशाल तडस यांनी शपथ घेतली.तर सौ. कुंजन वेद यांनी कॅटच्या महिला विंग अध्यक्ष दिपाली देशपांडे, उपाध्यक्ष काजल राजवैद्य,सचिव रविता शर्मा, सहसचिव रुची गुप्ता,कोषाध्यक्ष जयश्री दहातोंडे, डॉ. आरती गोयनका समवेत महिला सदस्यांना शपथ दिली. निकेश गुप्ता यांनी व्यापारी व उद्योजकांच्या सेवेसाठी कॅटची अकोला शाखा कार्यरत राहणार असल्याचे सांगितले. विनोद कलंत्री यांनी महिलांनी स्टार्टअपच्या माध्यमातून व्यवसाय सुरू करून शासनाच्या कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. अशोक दालमिया यांनी विदर्भातील उद्योजकांनी आपला दर्जा व गुणवत्ता सुधारण्याचे आवाहन केले. वसंत बाछुका यांनी किरकोळ व्यापा- यांच्या अडचणी निराकारणासाठी कॅट सक्षम असल्याचे सांगितले. सौ. वेद यांनी महिलांनी कॅटचे सदस्य होण्याचे आवाहन केले

आ. रणधीर सावरकर यांनी पारंपारिक उद्योग व्यवसायात एआयचा वापर करून उद्योग व व्यवसाय आधुनिक करावा असे आवाहन केले. बीसी भरतीया यांनी राष्ट्रातील नऊ कोटी व्यापारी व उद्योजक असणाऱ्या कॅटला शाखा स्थापनेत भरपूर प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले. स्वागत भाषण राहुल गोयनका एवं दीपाली देशपांडे यांनी केले. संचालन राम ठक्कर व मनीष केडीया यांनी तर आभार सौ. रविता शर्मा यांनी मानले. महानगरातील व्यापारी व उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार राष्ट्रनिर्मितीचा पाया' - प्रा. राहुल माहुरे

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अकोला:** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार राष्ट्रनिर्मितीचा पाया असल्याचे प्रतिपादन एलआरटी वाणिज्य महाविद्यालयच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीरामध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलताना वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. राहुल माहुरे यांनी केले. रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. नागनाथ गुट्टे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ मोनिका साबू,

प्रा. प्रकाश गवई, प्रा. उज्ज्वला डांगे उपस्थित होत्या.

सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन




करण्यात आले. प्रा. प्रकाश गवई यांनी प्रास्ताविक आणि प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. प्रा. राहुल माहुरे म्हणाले, डॉ. बाबासाहेबांचे सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय योगदान आजही देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी प्रेरणादायी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संघर्ष, त्यांनी दिलेला शिक्षणाचा मुलमंत्र आणि भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीमधील त्यांचे अतुलनीय योगदान यावर प्रा. राहुल माहुरे यांनी संदर्भासहित भाष्य केले. तसेच बाबासाहेबांनी आयुष्यभर समता आणि बंधुत्वासाठी लढा दिला. त्यांनी दिलेला 'शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा' हा संदेश केवळ पुस्तकी नसून तो जगण्याचा मार्ग आहे. असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे संचालन पलक उज्जैनकर यांनी तर आभार प्रदर्शन हर्षा घोगरे यांनी केले.

## एजाज खान प्रीमियर लिगचा दिमाखदार शुभारंभ

**अकोला:** एजाज खान प्रीमियर लिग टेनिस बॉल क्रिकेट चषकाचा उद्घाटन सोहळा ५ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवणी येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या उद्घाटन सोहळ्यास शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख शारदाताई वाडके, संतोष वाडके, शेख हनिफ यांच्यासह आयोजक एजाज खान, विनोद मिश्रा, अध्यक्ष सतिश फाले, उपाध्यक्ष देवानंद मुरुमकार, सचिव सचिन जगताप, सल्लागार जाकीर शाह, किशोर आखरे, गिरीश ठाकूर, विजय मेश्राम, महाराष्ट्र बहुजन पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष प्रमोद मुरुमकार आदींची प्रमुख उपस्थिती लाभली होती. स्पर्धेतील पहिला सामना रवी ऐलेवन क्रिकेट क्लब, मलकापूर व तुळजाई पेव्हर्स क्रिकेट क्लब, शिवर यांच्यात खेळविण्यात आला.

## मुंडगाव येथे सुपीनाथ महाराज यात्रा महोत्सव

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

### फेब्रुवारी शिव महापुराण कथेचे आयोजन

**अकोट:** तालुक्यातील संत नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंडगाव येथील सुपिनाथ महाराज शिव मंदिर भव्य यात्रा महोत्सवा निमित्त शिव महापुराण सदृष्य कथा वाचक ह भ प गजानन महाराज हिरुळकर हे तर या सप्ताहाचे मार्गदर्शक हभप सुदर्शन महाराज खडसने हे राहणार आहेत. तर या महोत्सवाचा शुभारंभ दि. ९ फेब्रुवारी रोजी होणार आहे व सांगता दि.१६ फेब्रुवारी रोजी होणार आहे. या सप्ताहात नामांकित किर्तन कार लाभणार आहेत.या मध्ये दि.९ फेब्रुवारी रोजी हभप सुदर्शन महाराज खडसने यांचे हरिकीर्तन, दि. १० फेब्रुवारी रोजी हभप ज्ञानेश्वर महाराज भालतिलक यांचे हरिकीर्तन, दि. ११ फेब्रुवारी रोजी हभप त्र्यंबक महाराज अवारे यांचे हरिकीर्तन, दि.१२ फेब्रुवारी रोजी हभप वैभव महाराज तराळ यांचे हरिकीर्तन, दि. १३ फेब्रुवारी रोजी हभप राम महाराज गवारे यांचे हरिकीर्तन, दि.१४ फेब्रुवारी रोजी हभप शुकदास महाराज गाडेकर यांचे



हरिकीर्तन, दि.१५ फेब्रुवारी रोजी हभप हरीष महाराज पाटील यांचे हरी किर्तन,दि.१६ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ते११ हभप गजानन महाराज हिरुळकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. तसेच या सप्ताहात अन्नदाते गजानन वारकरी, उमेश दोरकर, बाळुभाऊ काठोके, राधाबाई येवतकार, रामरतन पाथ्रीकर, गजानन थारकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, डिंगाबर कुटे, मनोहर ठाकरे, महादेव आखरे, अंकुश गोमासे, विजय आखरे, विलास ठाकरे, साहेबराव लोखंडे, पुरुषोत्तम दहिभात, अंकुश ढोकणे हे राहणार आहेत. या सप्ताहात रोज सकाळी काकडा, दुपारी १ते५ महाशिवपुराण कथा ,सायंकाळी ६ते७ हरीपाठ, रात्री ८.३० ते १०.३०हरीकिर्तन होणार आहे. तर दि १६फेब्रुवारी रोजी गोपाळकाला श्रीकृष्ण अवलिया भजन मंडळ यांच्या हस्ते होणार. तर याच दिवशी संत राजुनाथ महाराज, संत संकेत महाराज, संत गाठोडे महाराज यांचे आगमन होणार आहे. तसेच या यात्रा महोत्सवात सहभागी होणाऱ्या सांप्रदायिक भजन मंडळ, ढोलाचे भजन मंडळ, ठाव्याचे भजनी मंडळींना मानधन व जाणे येणे चा प्रवास खर्च देण्यात येणार आहे. काल्याच्या किर्ताना नंतर महाप्रसादाचे वितरण होणार आहे. तरी या सप्ताहात व यात्रा महोत्सवाचा जास्तीत जास्त भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन सुपिनाथ महाराज शिव मंदिर संस्थान, विश्वस्त मंडळ, सल्लागार मंडळ व उत्सव समिती व सर्व गावकरी मंडळी मुंडगाव यांनी केले आहे. तसेच या मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी आपण सुध्दा आपले योगदान व सरळ हाताने मदत करावी असे आवाहन संस्थान चे अध्यक्ष गजानन वारकरी व विश्वस्त मंडळ यांनी केले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. ०७ फेब्रुवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# पोलिसांची कुंटणखान्यावर धाड

## महिलेसह पुरुषाला अटक

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**यवतमाळ :** पोलीस स्टेशन यवतमाळ शहराच्या DB पथकाने वाघापुर नाका ते पिंपळगाव रोडवरील समर्पण अपार्टमेंटमध्ये चालत असलेल्या वेश्या व्यवसायावर छापा मारला. या कारवाईत एक आरोपी महिला, आरोपीच्या मदतीने ग्राहक आणणारा पुरुषाला जेरबंद करण्यात आले.

पोलीसांच्या माहितीनुसार, ६ फेब्रुवारी रोजी पोलीस उपनिरीक्षक गणेश सपकाळ यांना गोपनीय माहिती मिळाली की समर्पण अपार्टमेंटमध्ये कुंटनखाना चालू आहे. या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक रामकृष्ण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली DB पथकाने बनावट ग्राहकाची मदत घेऊन अपार्टमेंटमध्ये छापा टाकला.

छाप्यात फ्लॅट क्र. २ मध्ये आरोपी महिला, ग्राहक आणणारा आरोपी अंकुश रामभाऊ कडू (वय ४०, रा. भेंडाळा, ता. गंगापूर, जि. संभाजी नगर) आणि पीडित महिला आढळून आल्या.

पीडित महिलेला सुरक्षितरीत्या मुक्त करण्यात आले. या प्रकरणी अनैतिक व्यापार प्रतिबंधक अधिनियम, १९५६ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



सदर कारवाई पोलीस अधिक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधिक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश बैसाने यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली. DB पथकातील पोलीस उपनिरीक्षक गणेश सपकाळ, पोहवा/२०१२ रावसाहेब शेंडे, पोशी/४०० मयुर, पोशी/२२४० प्रतिक, मपोशी/२३० निलीमा आणि मपोशी/२४७८ प्रियंका यांनी ही कारवाई केली.

# मदतीपासून वंचित पुरग्रस्तांचा उपोषणाचा इशारा

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**उमरखेड :** तालुक्यात जुलै ते सप्टेंबर दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पूरस्थिती निर्माण झाली होती. या पुरात शेतजमीन, घरे तसेच घरातील अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचे प्रचंड नुकसान झाले होते. नुकसानग्रस्तांना सानुग्रह अनुदान मिळावे, यासाठी प्रशासनाकडून पंचनामेही करण्यात आले; मात्र या प्रक्रियेत अनेक खरे पुरग्रस्त डावलले गेल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे.

प्रशासनाकडे तक्रारी वाढल्यानंतर उमरखेड तहसीलदारांनी वंचित पुरग्रस्तांचे पंचनामे करण्याचे निर्देश दिले होते. तथापि, बंदी भागातील कोरटा, चिखली व निंगणूर या गावांतील केवळ ५० ते ६० जणांनाच सानुग्रह अनुदान देण्यात आले असून उर्वरित पुरग्रस्तांना मदतीपासून वंचित ठेवण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर कोरटा, निंगणूर व चिखली येथील पुरग्रस्त ग्रामस्थांनी तहसीलदार, उमरखेड यांना संयुक्त निवेदन देत आठ दिवसांच्या आत आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. मागणीची पूर्तता न झाल्यास दि. १२ फेब्रुवारीपासून साखळी उपोषण सुरू करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.



### कार्यालयातील बाबूची 'बाबुगिरी' पुन्हा चर्चेत

■ तहसील कार्यालयातील ऐनवार नामक कर्मचाऱ्याने अनुदानाच्या चौकशीसाठी आलेल्या पुरग्रस्तांशी अरेरावीची भाषा वापरल्याचा आरोप ग्रामस्थांनी निवेदनातून केला आहे. त्यामुळे तहसील कार्यालयातील कारभार व कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या निवेदनावर मोहन नाईक, आश्विन राठोड, बालाजी महल्ले, मधु आडे, हिरासिंग राठोड, रामराव माहुरे, चंद्रभान माहुरे, कृष्णा डाके, बळीराम आसोले, विश्वनाथ पोटे, कैलास वाळले यांच्यासह अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या प्रकरणात प्रशासन कोणती भूमिका घेणार, याकडे संपूर्ण बंदी भागातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# कर्जाच्या तणावातून शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**महागाव :** शहरापासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर असलेल्या पिंपरी शिवारातील दत्तोबाच्या टेकडीजवळ शेतकरी विजय अवधूत कदम (वय ६०, रा. महागाव) यांनी कर्जाच्या तणावातून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. दिनांक ४ फेब्रुवारी २०२६ रोजी ते घरातून बाहेर पडल्यानंतर बेपत्ता होते. त्यांच्या अंगावर खाजगी सावकारांचे तसेच बँकेचे मोठे कर्ज असल्याचे बोलले जात आहे.

सततच्या आर्थिक अडचणी आणि कर्जफेडीच्या चिंतेमुळे त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. दिनांक ६ फेब्रुवारी रोजी गुरेढोरे चारणाऱ्या नागरिकांना झाडाला लटकलेला मृतदेह आढळून आला.

त्यांनी तात्काळ ही बाब संबंधितांना कळविली. माहिती मिळताच महागाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला व मर्ग दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून शेतकरी कुटुंबांमध्ये तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

# विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त वातावरणात निर्भयपणे परीक्षा द्यावी : मोहम्मद मुसद्दीक

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**फुलसावंगी :** इयत्ता १० वी व १२ वीच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांना फेब्रुवारी २०२६ पासून सुरुवात होत असून, विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त, शांत व सुरक्षित वातावरणात परीक्षा देता यावी, यासाठी शिक्षण विभागासह प्रशासन पूर्णतः सज्ज झाले असल्याची माहिती केंद्र संचालक मोहम्मद मुसद्दीक यांनी दिली.



परीक्षेदरम्यान कोणतेही गैरप्रकार घडू नयेत, यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर कडक बंदोबस्त ठेवण्यात आला असून सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच परीक्षा केंद्रांच्या परिसरात कलम १४४ लागू करण्यात आले असून अनावश्यक गर्दीवर निर्बंध घालण्यात आले आहेत.

परीक्षा प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व विश्वासार्हपणे पार पाडण्यासाठी शिक्षण विभाग, महसूल विभाग व पोलीस प्रशासन यांच्यात योग्य समन्वय साधण्यात आला आहे. यासाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व पर्यवेक्षक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी परीक्षा काळात कॉपीमुक्त वातावरण राखण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या असून विद्यार्थ्यांवर कोणत्याही प्रकारचा मानसिक ताण येऊ नये, याची विशेष काळजी घेण्याचे आदेश दिले आहेत. यावेळी केंद्र संचालक मोहम्मद मुसद्दीक यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले की, कोणत्याही गैरप्रकारांचा अवलंब न करता नियमांचे पालन करून शांत, निर्भय व आत्मविश्वासाने परीक्षा द्यावी.

# जवळा येथे 'JPL' क्रिकेट स्पर्धा

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**आर्णी :** जवळा प्रीमियर लीग (JPL) क्रिकेट स्पर्धेचे सामने शनिवार, दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले आहेत. या स्पर्धेचे आयोजन भाजप तालुकाध्यक्ष रविंद्र राठोड यांच्या पुढाकारातून करण्यात आले असून, उद्घाटन सोहळा मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. यावेळी नितीनजी भूतडा (जिल्हा समन्वयक), प्रफुल्लजी चव्हाण (जिल्हा अध्यक्ष), आमदार राजूजी तोडसाम, डॉ. संदीपजी धुर्वे (माजी आमदार), एन. टी. जी. जाधव (माजी जिल्हा कोषाध्यक्ष), बालासाहेब चावरे (माजी तालुका अध्यक्ष) तसेच माधवजी राठोड (जिल्हा उपाध्यक्ष, व्हीजेएनटी आघाडी) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

जवळा–लोणी गणातील क्रिकेटप्रेमी युवक, नागरिक तसेच भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, जिल्हा व तालुका कार्यकारिणी सदस्य, बूथ अध्यक्ष व शक्तिकेंद्र प्रमुख यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक भाजपा तालुकाध्यक्ष रविंद्र राठोड यांनी केले आहे.

ही स्पर्धा कुलरवार यांच्या शेतात, बसस्टॉपजवळ, गुरुदेव शाळेसमोर, जवळा येथे दुपारी २ वाजता सुरू होणार आहे.

# समता पर्वच्या मुख्य संयोजकपदी नारायण थूल

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**यवतमाळ :** समता पर्व प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या समता पर्व 2026 साठी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नारायण थूल यांची मुख्य संयोजक म्हणून, तर डॉ. सुमेध देवतळे यांची कार्यकारी समन्वयक आणि उमेश मेश्राम यांची प्रवक्ते म्हणून एकमताने निवड करण्यात आली आहे.



महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी आयोजित करण्यात येणारा समता पर्व हा उपक्रम गेल्या २१ वर्षांपासून यवतमाळ येथे सातत्याने व भव्य स्वरूपात साजरा करण्यात येत आहे. या पर्वाच्या माध्यमातून देश-विदेशातील नामवंत विचारवंत, मानवतावादी मार्गदर्शक तसेच प्रसिद्ध कलावंत यवतमाळमध्ये उपस्थित राहत असून सामाजिक प्रबोधनाचे महत्त्वपूर्ण कार्य घडत आहे.

७ ते १४ एप्रिलदरम्यान भरगच्च कार्यक्रम यंदा ७ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत समता पर्व अंतर्गत विविध सामाजिक, सांस्कृतिक, प्रबोधनात्मक व कलात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या आयोजनाच्या पार्श्वभूमीवर यवतमाळ येथील शासकीय विश्राम भवन येथे ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत तथा समता पर्व प्रतिष्ठानच्या संस्थापक सदस्या डॉ. लीलाताई भेले यांच्या अध्यक्षतेखाली सहविचार सभा संपन्न झाली. या सभेत नारायण थूल, डॉ. सुमेध देवतळे व उमेश मेश्राम यांची निवड एकमताने मंजूर करण्यात आली. त्यांच्या निवडीचे सभागृहात टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. यवतमाळ आयडलची जबाबदारी इंजि. धर्मपाल भितकर यांच्याकडे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. समता, बंधुता, न्याय व मानवतावादी मूल्यांचा जागर करणारा समता पर्व 2026 यंदा अधिक व्यापक, सहभागात्मक व प्रभावी स्वरूपात साजरा होणार असल्याचा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.

# AIMIM चे प्रदेश उपाध्यक्ष हाजी युसुफसेठ पुंजानी आर्णी दौऱ्यावर

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**आर्णी :** आर्णी शहरात राजकीय धुरा हलण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुसलिमिन (AIMIM) पक्ष शहरात आपली जोरदार उपस्थिती नोंदवण्यासाठी सज्ज झाला आहे. पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष हाजी युसुफसेठ पुंजानी, जिल्हाध्यक्ष सय्यद इरफान, सलीमजी सांगवान, युवा जिल्हाध्यक्ष अंजुमलाला यांसह अनेक पदाधिकारी ८ फेब्रुवारी रोजी रविवार आर्णी दौऱ्यावर येणार आहेत. दरम्यान, ते सर्वधर्मीय सलोख्याचे प्रतीक असलेल्या बाबा कंबलपोष दर्गा येथे दर्शन घेतील. दर्शनानंतर शहरातील विविध पक्षांचे पदाधिकारी यांच्या घरी भेटी देऊन आगामी पक्षप्रवेश कार्यक्रमाची तारीख निश्चित केली जाणार आहे. स्थानिक राजकीय विश्लेषकांच्या मते, या पक्षप्रवेशामुळे शहरातील राजकीय समीकरणे बदलू शकतात. २०२२ पासून स्थानिक MIM पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे आता AIMIM ला आर्णी शहरात बळ मिळण्याची शक्यता आहे. आगामी काळात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढण्याची स्पष्ट चिन्हे दिसत आहेत.



# चिमुकल्यांच्या नृत्यातून मांडले मोबाईलचे दुष्परिणाम

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**महागाव :** येथील स्व. मोहनलालजी पुरोहित कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित 'घे भरारी' वार्षिक स्नेहसंमेलनात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी आपल्या बहारदार नृत्याविष्कारातून मोबाईलच्या अति वापरामुळे होणारे दुष्परिणाम प्रभावीपणे सादर करत उपस्थितांची मने जिंकून घेतली.



या स्नेहसंमेलनात रामलालजी पुरोहित इंग्लिश मिडीयम स्कूलमधील केजी-२ वर्गातील विद्यार्थ्यांनी मानवी जीवनात मोबाईलचे असलेले महत्त्व तसेच त्याचे वाढते दुष्परिणाम वास्तववादी पद्धतीने नृत्याच्या माध्यमातून मांडले. चिमुकल्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

स्नेहसंमेलनाचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष अभय मस्के (तहसीलदार, महागाव) यांच्या अध्यक्षतेखाली ठाणेदार धनराज निळे व नगराध्यक्षा सौ. सुनंदा दिलीपराव कोपरकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रितेश पुरोहित, उपनगराध्यक्ष प्रमोद भरवाडे, बाजार समितीचे सभापती रविंद्र पवार, संचालक किशोर देशमुख, विनोद पाटील राऊत, नगरसेवक शैलेश कोपरकर, सुजित ठाकुर, भाजप शहराध्यक्ष निलेश नरवाडे, माजी उपनगराध्यक्ष सुरेश पाटील नरवाडे, देवानंद पाटील दुपात्रे, शिवसेना (उबाठा) विधानसभा प्रमुख भिमराव भालेराव, तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष महेश कामारकर, पत्रकार विशाल डहाळे, शेरखान पठाण, गोपी चक्करवार, संजय अमिलकंठवार यांच्यासह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोबाईलमुळे जग जवळ आले असून अनेक कामे सुलभ झाली असली, तरी त्याचा अतिरेक मानवी जीवनावर विपरीत परिणाम घडवत असल्याचे वास्तव गीत व नृत्याच्या माध्यमातून चिमुकल्या कलाकारांनी मांडले.

रियांशु धवसे, मोहन दलसिंगारे, सार्थक नरवाडे, अथर्व मिरासे, जैनाब पठाण, शर्वरी भंडारे, आराध्या पायघन व सान्वी राठोड या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याने कार्यक्रमात रंगत भरली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. जी. एस. स्वामी, प्रा. अनुप पवार, प्रा. वर्षा देशपांडे, प्रा. ए. टी. मुनेश्वर, प्रयोगशाळा सहाय्यक अमितकुमार चव्हाण, शीतल जाधव, अजेश पवार, इंग्लिश मिडीयम स्कूलच्या व्यवस्थापिका मालती भारती, प्राचार्य विद्या ठाकरे, शिक्षिका रेश्मा राणे, वर्षा बर्डे, सृष्टी नरवाडे, प्रणिता दलसिंगारे यांच्यासह सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य दिपक संगेवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. गोरे यांनी मानले.

# अखंड शिवनाम सप्ताह व शिवमहापुराण कथा

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**उमरखेड :** येथील छत्रपती शिवाजी वॉर्डातील महात्मा बसवेश्वर संस्थान संचलित शिवमंदिरामध्ये येत्या सोमवार, दि. ९ फेब्रुवारी २०२६ पासून अखंड शिवनाम सप्ताह, शिवमहापुराण कथा व ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा गुरुमाऊली राष्ट्रसंत वसुंधरारत्न डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या कृपाआशीर्वादाने संपन्न होणार आहे.



या सप्ताहात दररोज सकाळी ५ ते ६ शिवपाठ व शिवनाम जप, ६ ते ७ अभिषेक व आरती, ८ ते १० ग्रंथराज परमरहस्य पारायण, दुपारी २ ते ४ गाथा भजन, ४ ते ५ शिवपाठ व नामजप होणार असून दररोज रात्री शि.भ.प. सागर महाराज (वाशिम) यांच्या सुश्राव्य वाणीतून शिवमहापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री १० ते सकाळी ५ या वेळेत अखंड शिवभजन व शिवजागर होणार आहे. सप्ताहाची सुरुवात सोमवार रोजी महादेवाला अभिषेक व पंचकलश पूजनाने होणार आहे.

मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता गु.ष.ब्र. १०८ रुद्रमुणी शिवाचार्य महाराज (मुदखेड) यांचे आशीर्वचन होणार आहे.

शनिवार, दि. १४ फेब्रुवारी रोजी गु.ष.ब्र. १०८ शिवचैतन्य शिवाचार्य महाराज (महादेव मठ संस्थान, हदगाव) यांचे आशीर्वचन लाभणार आहे. रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर, सकाळी ८ ते १० या वेळेत श्रीमती रजनीताई वगरकर (नागपूर) यांच्या मार्गदर्शनाखाली सामूहिक इष्टलिंग पूजा होणार आहे. दुपारी १ ते २ या वेळेत शि.भ.प. सौ. रत्नमाला विनोदस्वामी (हदगावकर) यांचे टाळ-आरती कीर्तन होईल. सायंकाळी ७ ते १० या वेळेत शिवमहापुराण कथेची सांगता होऊन त्यानंतर महाशिवरात्री निमित्त महादेवाला रुद्राभिषेक केला जाणार आहे. सोमवार, दि. १६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता महात्मा बसवेश्वर संस्थान येथून ग्रंथराज परमरहस्य पारायण ग्रंथाची भव्य शोभायात्रा निघणार आहे. दुपारी १२ वाजता शि.भ.प. महादेव नरवाडे महाराज यांचे प्रसादावरील कीर्तन, त्यानंतर गुरुवर्य ष.ब्र. वेदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज (थोरलामठ, वसमत) यांचे आशीर्वचन होणार असून दुपारी ४ वाजता महाप्रसादास सुरुवात होणार आहे. संपूर्ण सप्ताहात परमरहस्य पारायण व्यासपीठ शि.भ.प. रजनीताई वगरकर सांभाळणार असून शिवपाठ, नामजप, गाथा भजन व कीर्तनात केशवअप्पा वैद्य, धनाजी यशवंत निलेकर, मृदुंगाचार्य गणेश लोणेश वैद्य, तसेच गायिका शि.भ.प. रत्नमाला विनोदस्वामी व विविध महिला व पुरुष भजनी मंडळे सहभागी होणार आहेत. दैनंदिन अभिषेक व आरतीचे पौरोहित्य पंचाक्षरी महाराज खडकेश्वर करणार आहेत.

गेल्या १४ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या या शिवनाम सप्ताहातील सर्व धार्मिक कार्यक्रम, शिवमहापुराण कथा व महाप्रसादाचा लाभ उमरखेड शहर व परिसरातील भाविकांनी घ्यावा, असे आवाहन अखंड शिवनाम सप्ताह उत्सव समिती व महात्मा बसवेश्वर संस्थान यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुलांमध्ये 'नकार' पचवण्याची क्षमता निर्माण करणे गरजेचे

## 'गीत नया गाता हूँ' कार्यक्रमात डॉ. प्रशांत गावंडे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**यवतमाळ :** यशापयश हा आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. आजच्या काळात मुलांमध्ये 'नकार' पचवण्याची क्षमता निर्माण करणे आणि त्यांना मानसिकदृष्ट्या सक्षम करणे गरजेचे आहे. कुटुंब आणि शिक्षण व्यवस्था मुलांच्या आयुष्याचं नंदनवनही करू शकतात आणि त्यांचे आयुष्य उध्वस्तही करू शकतात. एकूणच आयुष्य हे 'ईसीजी' सारखे चढ-उतारांचे असते, त्यामुळे अपयशाने खचून न जाता आत्मविश्वासाने त्यावर मात करावी, असे आवाहन सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे यांनी केले.

येथील डॉ. गायत्री काळे फाउंडेशनच्या वतीने 'गीत नया गाता हूँ' या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद यादगीरवार होते. प्रमुख अतिथी म्हणून आमदार बाळासाहेब मांगूळकर, डॉ. सुप्रभा यादगीरवार, फाउंडेशनचे अध्यक्ष सतीश काळे उपस्थित होते. 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' या विषयावर बोलताना डॉ. प्रशांत गावंडे यांनी पालक, मुले आणि शिक्षक यांच्या बदलत्या जबाबदाऱ्यांवर भाष्य केले. पालकांनी पाल्यांना मानसिकदृष्ट्या सक्षम करावे, असे ते म्हणाले. डॉ. गायत्री काळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ, तिच्या जन्मदिनी दुःखात न राहता समाजाप्रती तिचे स्वप्न पूर्ण करणे, हीच तिला खरी श्रद्धांजली ठरेल, असे डॉ. गावंडे म्हणाले.




या कार्यक्रमानिमित्त 'वर्तमान शिक्षणात विद्यार्थी व पालकांची भूमिका' या विषयावर आयोजित निबंध स्पर्धेला १०६ विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. पद्माकर मलकापुरे यांच्या चमूने स्पर्धेचे परीक्षण केले. यात रुपाली धुळे (प्रथम), अभिलाषा राजहंस (द्वितीय), मनाली खरात (तृतीय) यांनी यश मिळवले. तसेच गौरी गेडाम व रिया राठोड यांना प्रोत्साहनपर पारितोषिक देण्यात आले.

सतीश काळे व मीना काळे यांनी 'आम्ही सावित्रीच्या लेकी' आश्रयालयातील दोन मुलींना दत्तक घेतले. तसेच तेथील ५३ मुलींच्या शिक्षणासाठी स्टॉल उभारून मदतीचे आवाहन केले व भोजनदान राशी सुपूर्द केली.

यावेळी वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्याबद्दल डॉ. आचल कोरडे हिचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात डॉ. सुप्रभा यादगीरवार यांनी जीवनपद्धतीवर प्रकाश टाकला, तर डॉ. प्रमोद यादगीरवार यांनी योग, ध्यान आणि 'आर्ट ऑफ लिव्हिंग'चे महत्त्व विशद केले. डॉ. प्रशांत जिन्नेवार यांनी प्रास्ताविकातून फाउंडेशनच्या सामाजिक कार्याची भूमिका मांडली.

संचालन कैलास राऊत यांनी केले, तर ज्ञानेश्वर गायकवाड यांनी आभार मानले.

# शेतकऱ्यावर हल्ला

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**राळेगाव :** वडकी पोलीस स्टेशन अंतर्गत पिंपरी (सावित्री) गावात तुरी काढण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका शेतकऱ्यावर काठीने हल्ला झाल्याची गंभीर घटना घडली आहे. या प्रकरणी दोघा आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रमोद विजयराव बोडेकर (३१) यांनी वडकी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, ४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास शिवारात हा प्रकार घडला. आरोपी अविनाश तात्याजी बलकी व तात्याजी मारोती बलकी यांनी तुरी काढल्याच्या कारणावरून वाद घालून काठीने डोक्यावर हल्ला करून गंभीर जखमी केले तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. उपचारानंतर फिर्याद नोंदवून आरोपींविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# यवतमाळमध्ये 'शक्ती-भक्ती संस्कार कुंभ'

## १० हजार विद्यार्थी सामूहिक सूर्यनमस्कार, गीता पठण करणार

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**यवतमाळ :** गीता परिवाराच्या वतीने येत्या सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी यवतमाळमध्ये अभूतपूर्व संस्कार सोहळा आयोजित केला जात आहे. 'शक्ती-भक्ती संस्कार कुंभ' या नावाने होणाऱ्या या कार्यक्रमात १० हजारांहून अधिक शालेय विद्यार्थी सामूहिक सूर्यनमस्कार करणार आहेत आणि गीतेच्या भक्तियोग अध्यायाचे सामूहिक पठण करतील.

या सोहळ्याला श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष आणि गीता परिवाराचे संस्थापक, प.पू. स्वामी गोविंददेव गिरिजी महाराज यांच्या पावन उपस्थितीचा मान मिळणार आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा संस्कार सोहळा संपन्न होईल.

गीता परिवाराची सुरुवात संगमनेरमध्ये झाली, आज हे कार्य २१ राज्ये आणि ६५ देशांपर्यंत पोहोचले आहे. यापूर्वी कोट्यवधी सूर्यनमस्कारांचे अभियान राबवून संस्था अनेक जागतिक विक्रम गाठले आहेत. निमंत्रक मदन येरावार यांनी यवतमाळकरांना या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

■ कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये : सामूहिक सूर्यनमस्कार - विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक. गीतेचे सामूहिक पठण – जागतिक गीता परिवार अभियानाचा भाग.

■ देशी खेळांचे प्रदर्शन – शारीरिक स्वास्थ्यासाठी.

■ स्थळ व वेळ: नेहरू स्टेडियम, यवतमाळ; सकाळी ९:०० ते १०:३०

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि.७ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# पोकरातील भ्रष्टाचार, कृषी सहाय्यकांचा गैरव्यवहार !

## सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई झालीच पाहिजे

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

जिल्ह्यात सन २०१८ मध्ये राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा योजनेतील गैरप्रकरणाने जिल्हा ढवळून निघाला आहे. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील पोकरा गैरप्रकरणाची चौकशी लागली असून प्राथमिक तपासणी अहवाल सादर करण्यात आला आहे. सदर प्रकरणात विभागीय कृषी सहसंचालक अमरावती यांनी कार्यवाही करण्याचे आदेश सुद्धा दिले आहेत.मात्र, या प्रकरणातील केंद्रबिंदू असलेल्या नियमबाह्य विहीर आणि बोगस प्रस्तावांची बारकाईने तपासणी झाली नसल्याची खदखद व्यक्त केली जात आहे. परिणामी तक्रारदार यांनी असमाधान व्यक्त करत फेरतपासणी करण्यात यावी अशी मागणी केली आहे. तालुका कृषी अधिकारी व कृषी सहाय्यकांच्या मनमानी कारभारामुळे अनेक शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहिले आहेत. हा महत्त्वपूर्ण मुद्दा समोर ठेवून या गैरप्रकरणाचा तपास झाला पाहिजे अशी मागणी जिल्हावासीयांकडून केली जात आहे. त्यामुळे ' पोकरा ' योजनेला पोखरणारे कोण ? हा कळीचा मुद्दा उपस्थित करण्यात येत आहे. याची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जोर धरत आहे.





जिल्ह्यातील शेतकऱ्यांना हवामान बदलांना सर्वाधिक प्रमाणात सामोरे जावे लागत असल्याची बाब अनेक वेळा सिद्ध झाली आहे.गेल्या काही वर्षापासून येथील शेतकऱ्यांना कधी अतिवृष्टी, तर कधी कोरडा दुष्काळ, गारपीट अशा अनेक नैसर्गिक संकटांचा सातत्याने सामना करावा लागत आहे. ही बाब शासनाच्या लक्षात आल्याने नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा या महत्वाकांक्षी योजनेत वाशिम जिल्हा समाविष्ट करण्यात आला आहे. सदर योजनेचा पहिला टप्पा जून २०२४ मध्ये संपला असून या योजनेतील महत्वाचा दुवा असलेल्या कृषी सहायकाच्या मर्जीतून अनेकांना फर्जी अनुदान देण्यात आले असल्याची धक्कादायक माहिती आता समोर येत आहे.परिणामी कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मेहरबानीमुळेच कृषी सहायक पहेलवान बनले असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे नुकताच सुरु झालेल्या पोकरा योजनेच्या दुसऱ्या टप्प्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

पोकरा योजनेच्या पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील एकूण १४९ गावांचा समावेश करण्यात आला होता. त्यात मालेगाव मधील १७ गावे, कारंजा मधील ३३ गावे, मानोरा तालुक्यातील ३९ गावे, मंगरूळपीर मधील २२ गावे, वाशिम मधील २० तर रिसोड तालुक्यातील १८ गावांची निवड करण्यात आली होती.समस्याग्रस्त गावातील प्रत्येक शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावा हा या योजनेचा मुख्य उद्देश होता. मात्र या योजनेतील कृषी विभाग आणि शेतकरी यांच्यातील महत्वाचा दुवा असलेल्या कृषी सहायकांनी स्वतःच्या आर्थिक स्वार्थासाठी निवडक शेतकऱ्यांच्या संगनमताने अनेक शेतकऱ्यांच्या तोंडाला पान उसले असल्याच्या तक्रारी दिवसागणिक पुढे येत आहेत. त्यात सर्वाधिक रिसोड तालुक्यातील असून शेलुखडसे येथेल वंचित शेतकरी आता वरिष्ठ स्तरावर रितसर तक्रारी दाखल करणार असल्याचे अनेक शेतकरी बोलत आहेत.

### ' चोरावर मोर ' प्रकरण समोर

रिसोड तालुक्यातील पोकरा योजनेत समाविष्ट असलेल्या गावात. कुठलिही वस्तू खरेदी न करता, ' अर्धे तुम्ही, अर्धे आम्ही ' या तत्वावर अनेक शेतकऱ्यांच्या नावाने फर्जी देयके देण्यात आली असल्याची खळबळ जनक माहिती हाती आली आहे. आर्थिक स्वार्थ्यांच्या लोभापोटी संबंधित कृषी सहायकाने योजनेच्या मुख्य उद्देशालाच ' खो ' देत सदर चलाखी केली आहे. परंतु यात अनेकजण ' चोरावर मोर ' झाले असून बँक खात्यात जमा झालेले फर्जी अनुदान ' अर्धे तुम्ही ' या कराराला तिलांजली देत, स्वतःच हडपले असल्याची माहिती समोर येत आहे. हा प्रकार खुप गंभीर असून अशा बोगस बिलांची व खरेदी केलेल्या तत्सम वस्तूची सखोल चौकशी होणे खुप गरजेचे आहे. या प्रकरणात पन्नास टक्के बोगस अनुदान वितरित करण्यात आल्याचे पितळ उघडे पडेल अशी खमंग चर्चा रिसोड तालुक्यात होत आहे.




## थोडक्यात

### नगराध्यक्ष अशोक परळीकर यांचा सत्कार



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

परम पूजनीय श्री जितेंद्रनाथ महाराज श्रीनाथ पिठादिश्वर देवनाथ मठ अंजनगाव सुर्जी या ठिकाणी नवनिर्वाचित नगराध्यक्ष अशोक भाऊ परळीकर व नवनिर्वाचित नगरसेविका सौ किरण ताई परळीकर हे देवनाथ मठामध्ये दर्शन घेतल्यानंतर पूजनीय जितेंद्रनाथ महाराज यांनी दोघांचा सन्मानपूर्वक सत्कार केला असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व तुमच्या हातून समाजसेवा घडावी असाही संदेश महाराजांनी दिला.

### नारी शक्तीचा सन्मान माहेश्वरी परिवाराचा पुढाकार

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर, येथील श्री चारभुजनाथ मंदिर, मंगरूळनाथ येथे महिला मंडळातर्फे आयोजित आनंद मेळाव्यात नवनिर्वाचित महिला व बालकल्याण सभापती सौ लताबाई पुरुषोत्तम चितलंगे बांधकाम सभापती सौ सपना गणेश ह्या नगरपरिषद मंगरूळपीर निवडणूक मध्ये विजय झाल्याबद्दल महिला शक्तीचा माहेश्वरी समाज व विदर्भ प्रदेशचे सहमंत्री श्री शिवलाल भुतडा, वाशिम जिल्हाध्यक्ष श्री कैलास मुंदडा, सचिव श्री सुनील गट्टाणी, विदर्भ प्रदेश कार्यसमितीचे सदस्य संजय राठी, जिल्हा सहसचिव श्री सतीश राठी, जिल्हा उपाध्यक्ष डॉ रोशन लाहोटी, मंगरुळपीर तहसील अध्यक्ष हरीश बियाणी, सचिव अभिजित भुतडा, कृष्णा बजाज यांचा उपस्थितनी सन्मानपूर्वक महिला शक्तीचा सत्कार करण्यात आला. आणि राजस्थानी महिला मंडळाच्या नवनिर्वाचित अध्यक्षा सुरेखा बाहेती, सचिव भूमिका बियाणी यांचे स्वागत व पुष्पगुच्छ शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला .

# शेतकऱ्याला न्यायाची आशा, नायब तहसीलदारांची चेथावणीची भाषा !

## * उद्धट भाषेमुळे नायब तहसीलदार वादाच्या 'भोवऱ्यात '*तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी लक्ष घालण्याची गरज

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

केनवड : रिसोड तालुक्यातील केनवड येथे वहिवटीच्या रस्त्यासाठी हक्क मागणाऱ्या शेतकऱ्याला नायब तहसीलदाराकडून आत्महत्या करण्याचा सल्ला दिल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या संपूर्ण प्रकाराचे व्हिडिओ सध्या सोशल मीडियावरील विविध व्हॉट्सॲप ग्रुपवर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. परिणामी शेतकऱ्यांसोबत नेहमीच उद्धट भाषा वापरणारे नायब तहसीलदार कुळमेठे पुन्हा एकदा वादाच्या भोवऱ्यात अडकले आहेत. या गंभीर बाबीकडे तहसीलदा प्रतीक्षा तेजनकर यांनी विशेष लक्ष घालावे अशी अपेक्षा तालुक्यातील शेतकरी व्यक्त करीत आहेत.

केनवड येथील शेतकरी गुलाब लक्ष्मण दांडगे यांचा वहिवटीचा रस्ता सुमारे ९ ते १० महिन्यांपासून अडविण्यात आला असून, त्यामुळे शेतातील तूर, हरभरा व गहू घरी आणता येत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे. सदर प्रकरण मामलेदार कार्यालयात प्रलंबित असून, गेल्या अनेक महिन्यांपासून केवळ तारखांवर तारखा दिल्या जात असल्याचे सांगण्यात आले.मा. तहसीलदारांच्या सूचनेनुसार स्थळ पाहणीसाठी सबंधित अधिकारी शेतात आले होते. या पाहणीदरम्यान पंचनामा करण्यात आला; मात्र तो एकतर्फी व अर्धवट असल्याचा आरोप सदर शेतकऱ्यांनी केला आहे. याच वेळी हक्काबाबत चर्चा सुरू असताना, सबंधित शेतकऱ्याने आमच्यावर अन्याय झाला तर, आम्हाला आत्महत्या करावी लागेल ! असे उद्विग्न अवस्थेत म्हटले आहे. मात्र यावर नायब तहसीलदार कुळमेथे यांनी



'मी माझ्या शेताच्या वहिवटीच्या रस्त्यासाठी कायदेशीर मार्गाने हक्क मागत आहे. हक्क मागणे जर चुकीचे असेल, तर प्रशासनाने ते स्पष्ट करावे. मात्र हक्क मागतो म्हणून मला आत्महत्या करण्याचा सल्ला देणे हे अमानवी आहे. नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी माझ्या शेतात स्पॉट पाहणीसाठी आले असताना, मी माझी अडचण मांडली. त्या वेळी 'आत्महत्या करा' असा सल्ला देण्यात आला. या प्रकारामुळे माझे संपूर्ण कुटुंब मानसिक तणावात आहे.जर माझ्या किंवा माझ्या कुटुंबातील कोणाचीही आत्महत्या झाली, तर त्यास सर्वस्वी नायब तहसीलदार कुळमेथे जबाबदार राहतील.'

**योगेश दांडगे, शेतकरी, केनवड**

करा मग.. असे उत्तर दिल्याने या प्रकरणाला वेगळी कलाटणी मिळाली आहे.परिणामी या विषयात तालुक्यात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

शेतकऱ्यांचा आरोप असा आहे की, पाहणीसाठी आलेल्या अधिकाऱ्यांनी रस्त्याची पाहणी करण्याऐवजी शेतकऱ्यांशी बोलताना उद्धट, आरडाओरड करणाऱ्या व अंगावर गेल्यासारख्या भाषेत संवाद साधला. 'आत्महत्या करा' असे शब्द वापरताना संबंधित अधिकारी पदाची गुर्मी असल्यासारखे, माजात बोलत होते. शेतकऱ्यांशी सन्मानाने वागण्याऐवजी दडपशाहीच्या सुरात संवाद साधल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेदरम्यान शेतकऱ्यांनी स्वतः चित्रीत केलेले व्हिडिओ तसेच स्पॉट पंचनामा करतानाचे दृश्य व्हॉट्सॲप ग्रुपवर फिरत असून, त्यामुळे रिसोड तहसील प्रशासनाचा कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. मात्र, या प्रकरणी अद्याप अधिकृत प्रशासनाकडून कोणतीही प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. महत्त्वाचे म्हणजे, रिसोड तहसीलमध्ये नायब तहसीलदार शेतकरी व नागरिकांशी उद्धटपणे वागणुकीची ही एकमेव घटना नसून, यापूर्वीही अशा प्रकारच्या अनेक तक्रारी समोर आल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे तहसील प्रशासनाच्या एकूणच कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.संबंधित प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून कारवाईची मागणी होत आहे.या घटनेमुळे शेतकरी वर्गात नाराजी व्यक्त होत असून, संबंधित प्रकरणाची तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

# उंबर्डा बाजार येथे प्रगट दिन महोत्सव

## श्रीमद् भागवत सप्ताह ज्ञान यज्ञ

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही उंबर्डा बाजार येथे श्री.समर्थ गजानन महाराज संस्थान व श्री.समर्थ गजानन महाराज स्मारक समिती च्या वतीने श्री.गजानन महाराज प्रकट दिन महोत्सव व संगीतमय श्रीमद् भागवत सप्ताह ज्ञान यज्ञ चे आयोजन करण्यात आले?, भागवताचार्य प.पु.बालयोगी स्वामी सारंग चैतन्य श्रीजी महाराज यांच्या मधुर वाणीतून संगीतमय भागवत कथा होत आहे.तसेच या सप्ताहामध्ये दररोज विविध महाराज यांचे कीर्तन ठेवण्यात आले आहे.त्यामध्ये ह.भ.प दादा महाराज नांदुरा, ह.भ.प.कु.गौरी पंडितराव राऊरकर परतवाडा,प्रवीण महाराज जाधव आळंदी,ह.भ .प. मोहिनी ताई खवले शेगाव, हभप रविंद्र महाराज खेडकर खामगाव,ह.भ.प.मुकेश महाराज चुडे सैनिक समाज प्रबोधन युवा कीर्तनकार दारव्हा,मा.रवी दादा संचालक गुरुदेव अध्यात्म गुरुकुंज मोझरी यांच्या कीर्तनाच्या आयोजन करण्यात आले आहे.संगीतमय श्रीमद भागवत सप्ताह मध्ये गोवर्धन पर्वत कृष्ण लीला करण्यात आल्या याचा हजारो संख्येने भक्तांनी लाभ घेतला.दिनांक ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ ते ९ गावातून शोभायात्रा काढण्यात येईल,तसेच ९ ते ११ काल्याचे किर्तन आणी १२ ते ५ वाजेपर्यंत महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.या भागवत सप्ताहाचा लाभ सर्व भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन व्यवस्थापक वसंतराव दामूसा श्रीराम यांनी केले आहे.



### घोटा-चिखली व पंचक्रोशीत...

# वन्य प्राण्यांचा हैदोस !

## *शेतकऱ्यांचा वाली कोण ? वनविभागही सुस्त...





●दिपक मापारी @ रिसोड●

येथून जवळच असलेल्या कोणत्यानही कोणत्या कारणाने प्रसिद्ध असलेले घोटा- चिखलीसह कवठा सर्कल मधील अनेक गावात व तालुक्यामध्ये अनेक भागात शेतामध्ये वन्यप्राणी शेती पिकाचे मोठे नुकसान करीत आहेत. अन्नाच्या शोधात रात्री रानडुकराद्वारे गहू हरभरा, सह काढणीला आलेल्या उभ्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले जात आहे. डुकरे रात्रीच्या वेळेस शेतात घुसून पिकाची नासधूस करीत असल्याने शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

दिवसभर शेतात राबून रात्री डुकरा पासून पिकाची राखण करण्याची वेळ शेतकऱ्यावर आली आहे. उभी पिक फस्त करून वन्य प्राणी शेतकऱ्यांच्या हाताशी आलेला घास हिसकावून घेत आहेत. या नुकसानीमुळे शेतकरी हतबल झालेला आहे. कमी पर्जन्यमानात मोठ्या कष्टाने अनेक अडचणींना सामोरे जात शेतकऱ्यांनी शेती फुलवलेली आहे. त्यामुळे या दिवसापासून रात्रभर जागरण करून, राहिलेल्या पिकांचे राखण करण्यात येत आहे.

शेतकऱ्यांनी डुकरांच्या त्रासामुळे ज्वारी पिक पेरणी बंद केली आहे. शेतकऱ्यांचा का कोणीच नाही स्थानिक लोकप्रतिनिधींना शेतकऱ्यांचे प्रश्न दिसत नाहीत का? शेतकऱ्यांच्या हितासाठी प्रशासनाने या डुकरांच्या बंदोबस्त करून शेतकऱ्यांच्या अडचणी व प्रश्नावर लवकर तोडगा काढावा व वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा अशी तीव्र मागणी शेतकरी करीत आहेत.

डुक्कर, रोही, हरण,वानर, मुळे रात्री बे रात्री शेतीची रखवाली करून सुद्धा शेती पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तरी शासनाने याचा लवकरात लवकर बंदोबस्त लावावा व झालेल्या नुकसानाची नुकसान भरपाई लवकरात लवकर देण्यात यावी.

**दिपक मापारी**, शेतकरी चिखली

मी माझ्या शेतात २ एकर हरभरा पेरला तेव्हा पासून सतत ३० दिवस शेतात रखवाली करून सुद्धा डुकरांनी हरभरा पिकाचे नुकसान केले. करावे तरी काय करावे हा प्रश्न मला पडला आहे. तरी शासनाने मला झालेल्या नुकसानीची नुकसान भरपाई द्यावी.

-(**किशोर मोरे**, शेतकरी घोटा)

# आईला निरोप देतानाही जपले रुग्णसेवेचे व्रत

## नेत्रदान चळवळीचे प्रणेते जगदीश बाहेकरांचा आदर्श; शोकसागरातही सामाजिक भान

●सिटी न्युज ब्युरो @ केनवड●

आईच्या निधनाचे अतीव दुःख उराशी असतानाही, 'रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा' हे ब्रीद जपत बाहेकर कुटुंबीयांनी एक हृदयस्पर्शी आदर्श समाजासमोर ठेवला आहे. तालुक्यातील किन्होळा येथील रहिवासी मनकर्णाबाई शेषराव बाहेकर (वय ८४) यांचे ६ फेब्रुवारी रोजी पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. या दुःखद प्रसंगी त्यांचे पुत्र जगदीश आणि भास्कर बाहेकर यांनी मातोश्रींचे नेत्रदान करून दोन अंधांच्या जीवनात प्रकाशाची नवी पहाट आणण्याचा महान निर्णय घेतला.



विशेष म्हणजे, जगदीश बाहेकर यांनी आपल्या सेवाकाळात वाशिम जिल्ह्यात नेत्रदान चळवळ उभी करून राज्याच्या पटलावर कौतुकास्पद कामगिरी बजावली होती. त्यांच्याच प्रयत्नांमुळे एकेकाळी वाशिम जिल्हा सामान्य रुग्णालयाची ख्याती 'दृष्टी देणारे रुग्णालय' म्हणून संपूर्ण पूर्व विदर्भात निर्माण झाली होती. सेवानिवृत्त नेत्र चिकित्सा अधिकारी असलेल्या बाहेकर यांनी आपली ही जनसेवेची कामगिरी निवृत्तीनंतरही अविरत सुरू ठेवली असून, आज स्वतःच्या आईच्या निधनानंतरही त्यांनी हे व्रत तितक्याच निष्ठेने जपले. मनकर्णाबाई बाहेकर यांच्या निधनानंतर अंत्यसंस्कार करण्यापूर्वी बाहेकर बंधूंनी नेत्रदानाचा संकल्प केला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बिराजदार आणि जिल्हा अंधत्व निवारण कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. रवी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. यावेळी नेत्र शल्य चिकित्सक डॉ. अमोल उगले, नेत्र चिकित्सा अधिकारी राजेंद्र देवकर, प्रवीण सोलंकी आणि समुपदेशक योगेश सिरसाठ यांनी तातडीने कार्यवाही केली.

'मृत्यूनंतरही आपल्या मातोश्रींचे डोळे या जगाकडे पाहत राहतील', या भावनेने बाहेकर कुटुंबीयांनी घेतलेल्या या धाडसी निर्णयाचे किन्होळा परिसरात आणि आरोग्य क्षेत्रातून मोठे कौतुक होत आहे. एका सेवाभावी अधिकाऱ्याने स्वतःच्या दुःखावर मात करून समाजाला दिलेला हा संदेश खऱ्या अर्थाने माणुसकीची ज्योत प्रज्वलित करणारा ठरला आहे.

### डॉ.मोहन चव्हाण यांची राष्ट्रीय बंजारा परिषदेच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड

●दिपक मापारी @ रिसोड●

डॉ.मोहन चव्हाण नांदेड यांची राष्ट्रीय बंजारा परिषद राष्ट्रीय अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे ही निवड धर्म नेता तथा उद्योगपती किसनभाऊ राठोड यांची नियुक्तीपत्र द्वारे केली आहे या पत्रामध्ये अशी म्हटले आहे की डॉ. मोहन चव्हाण यांचा सामाजिक राजकीय सांस्कृतिक क्षेत्रात केलेले उल्लेखनीय कार्य पाहता देशातील सर्वात मोठी संघटना राष्ट्रीय बंजारा परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे आपण आपले बुद्धी कौशल्य लोकशाही मार्गाने कायद्याच्या माध्यमातून सामाजिक जाण तपासून संघटनेचे नाव उज्वल करावे अशी अपेक्षा आहे आपण गोर बंजारा समाजा ला केंद्रबिंदू समजून त्याचा न्याय हक्क अधिकार मान सन्मान सोबत परिस्थितीनुसार उद्भवणाऱ्या सामाजिक तुम्ही कार्यात रहावे आपण करीत असलेल्या कार्याचा आढावा व लेखाजोखा प्रत्येक महिन्याला लेखी कळविण्यात यावा गोर बंजारा समाज त्याच्या सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक साहित्य आणि धार्मिक आर्थिक व राजकीय समस्या सोडवण्यासाठी कार्यरत राहून राष्ट्रीय बंजारा परिषद ही संघटना मजबूत करण्यासाठी प्रयत्न करावे असे या पत्रामध्ये म्हटले आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि.७ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# शहरात काळ्या फिल्मचा सर्रास वापर

## ◆ बंदी असूनही विना अडथळा धावताहेत वाहने

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील रस्त्यांवर मोठ्या संख्येने चारचाकी वाहनांना ब्लॅक फिल्म लावलेली पाहायला मिळत आहे. नियमांनुसार वाहनांच्या काचांवर ब्लॅक फिल्म लावण्यास सक्त बंदी आहे. असे असूनही, नियमांचे उघडपणे उल्लंघन केले जात आहे. विशेष म्हणजे यावर वाहतूक पोलिसांची कोणतीही कारवाई दिसून येत नाहीये. अशा परिस्थितीत, एखादी अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी नेमकी कोणाची असेल, असा सवाल आता उपस्थित होत आहे. शहरात सध्या चारचाकी वाहनांमध्ये ब्लॅक फिल्मचा वापर वेगाने वाढत आहे. वास्तविक, सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आणि वाहतूक नियमांनुसार गाड्यांच्या काचांवर ब्लॅक फिल्म लावणे प्रतिबंधित आहे. ब्लॅक फिल्म लावलेल्या वाहनांमुळे आत



बसलेल्या व्यक्तींची ओळख पटवणे कठीण होते. याचा फायदा घेत गुन्हेगारांना लपण्यास मदत मिळू शकते, ज्यामुळे कोणत्याही गुन्हेगारी घटनेनंतर तपासात अडचणी येतात. इतकेच नाही तर, रात्रीच्या वेळी किंवा कमी उजेडात अशा वाहनांमुळे रस्ते अपघातांचा धोका देखील वाढतो. याशिवाय, महिला आणि बालकांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही ही बाब चिंतेचा विषय ठरत आहे. नियम असूनही जर ब्लॅक फिल्म लावलेल्या गाड्या राजरोसपणे रस्त्यांवर धावत असतील, तर अनुचित घटनेची जबाबदारी कोणाची हा प्रश्न विचारला जाणे स्वाभाविक आहे. आता वाहतूक पोलीस यावर कधी आणि किती कडक कारवाई करतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# गजानन महाराज प्रगट दिनोत्सवाचा उत्साह

## फुलांच्या हारांना मोठ्या प्रमाणात मागणी

**अकोला :** संत गजानन महाराज यांच्या प्रगट दिनानिमित्त भाविकांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळत आहे. दर्शनासाठी आणि पूजा-अर्चनेसाठी देशभरातून भक्त शेगावात दाखल होत आहेत. भाविकांच्या या वाढत्या गर्दीचा थेट परिणाम फुलांच्या बाजारावर दिसून येत असून, हार आणि फुलांची मागणी अचानक वाढली आहे. परिणामी, हारांच्या किमतीतही मोठी वाढ झाली आहे. कोट्यवधींचे श्रद्धास्थान असलेल्या शेगावच्या संत गजानन महाराजांचा प्रगट दिन ८ तारखेला आहे.



# अकोला येथे राज्यस्तरीय वधुवर परिचय मेळावा उत्साहात

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी



**अकोला :** रविवार दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता राजयोग मंगल कार्यालय आळंदा फाटा बार्शिटाकळी रोड अकोला येथे महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच महा राज्य मुंबई जिल्हा शाखा अकोला, अहिल्यादेवी होळकर शोभा यात्रा समिती, धनगर समाज अधिकारी कर्मचारी संघटना, धनगर युवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय सर्व शाखीय धनगर समाज वधुवर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सुलताने, उद्घाटक दिपक बोराडे धनगर आरक्षण संघर्ष योद्धा स्वागताध्यक्ष केशवराव पातोंड से डि वाय एस पी, मुख्य प्रवर्तक साहेबराव पातोंड से नि शिक्षण विस्तार अधिकारी तथा विभागीय अध्यक्ष महाराणी अहिल्यादेवी समाज प्रबोधन मंच विभाग अमरावती, प्रमुख अतिथी डॉ जे पी बघेल राज्य सरचिटणीस,ॲड मुरारजी पाचपोळ, बिरू कोळेकर, ज्ञानेश्वर ढोमणे, गोपाल कोल्हे माजी सभापती, वसंतराव नागे, काशिराम साबळे, शाम घोंगे सभापती कृ उ बा स तेल्हारा, बळीरामजी चिकटे माजी सभापती, प्रमोदिनीताई कोल्हे, कैलासभाऊ घोंगे,श्रीकृष्ण वैतकार संचालक, गोपाल गावंडे, पुष्पाताई गुलवाडे माजीनगर सेविका, ॲड मंजु लाखे (कायंगे ), जयश्री नवलकार, श्रीमती सुरेखाताई पातोंड, सुधाकर गाडगे से नि पी एस आय, गजानन गावंडे पी एस आय, रमेश उभे जिल्हाध्यक्ष धनगर समाज महासंघ, भारतभाऊ बरिंगे, प्रल्हाद अघडते,मनिष गावंडे विभागीय अध्यक्ष युवक आघाडी, गजानन गायकवाड क्षेत्र सहा अधिकारी वन विभाग, डॉ सागर वसतकार, डॉ अशोक भवटे बुलढाणा, डॉ सतिष घाटोळ, सदानंद कळम सर, प्रविणभाऊ वसतकार रॉयल इलेक्ट्रीकल्स कल्याण, मोहनभाऊ रोकडे , रविद्र महाराज गुरव, रामरावजी घोडस्कार महाराज अमरावती,नितीन नवलकार, महादेवराव साबे, बांबल साहेब, मारोती दिवनाले,प्रविण वसतकार, डॉ भवटे, गजानन अगर्ते से नि बी डी ओ, बिपीनचंद्र लाखे, प्रभाकरराव दिवनाले दादाराव सुलताने, विकी लाखे जिल्हाध्यक्ष युवक आघाडी, विशाल दिवनाले शहराध्यक्ष युवक आघाडी, दिपक नागे विभागीय उपाध्यक्ष, अनिल पातुर्डे जिल्हाध्यक्ष, शंकरराव भदे विभागीय सचिव, मनोहर बाहे जिल्हा कार्याध्यक्ष, सुरेश दिवनाले जिल्हा सचिव , दिपक पातोंड जिल्हाध्यक्ष कर्मचारी संघटना,सचिन लाखे तालुकाध्यक्ष अकोला, विनोद वैतकार तालुकाध्यक्ष अकोट, किशोर कोल्हे तालुकाध्यक्ष तेल्हारा, मघाजी साबे तालुकाध्यक्ष बाळापूर, समाधान सोर तालुकाध्यक्ष पातुर, शांताराम तालुकाध्यक्ष बार्शिटाकळी, सुनिल पंडित तालुकाध्यक्ष मुर्तिजापूर विनोद काळे विस्तार अधिकारी, रामकृष्ण सोनाग्रे नागपूर जानरावजी घटाळे, केशवराव दिवनाले, अनंतराव खराटेहे होते राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेविच्या प्रतिमा पुजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन दिपक बोराडे यांनी दिप प्रज्वलन करून केले उपस्थित अतिथी दिपक बोराडे, डॉ जे पी बघेल , ॲड मुरारजी पाचपोळ, बिरु कोळेकर यांना सामाजीक कार्य गौरव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समाज भूषण पुरस्कार सन्मान पत्र देऊन कार्यकारी मंडळाचे वतीने सन्मानित करण्यात आले राजमाता पुण्थश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी वर्ष महोत्सव निमित्याने उपस्थित महिला भगिनीच्या हस्ते अतिथीच्या उपस्थित वधुवर परिचय पुस्तीका प्रकाशन करण्यात आले उपवर मुले मुली यांनी आपला परिचय दिला मेळाव्याला दिपक बोराडे, ज्ञानेश्वर सुलताने, बळीरामजी चिकटे, जे पी बघेल, बिरु कोळेकर, ॲड पाचपोळ, पुष्पाताई गुलवाडे, काशिराम साबळे, गोपाल कोल्हे, यांनी मार्गदर्शन केले प्रास्ताविक साहेबराव पातोड, संचलन शंकरराव भदे, परिचय पुस्तीका विश्लेशन मनोहर बाहे, आभार प्रदर्शन सुरेश दिवनाले यांना केले कार्यक्रम यशस्वी करण्याकरीता नितीन कोगदे, मनोज करणकार, ज्ञानेश्वर कवळकार, सुनिल खराटे, विक्की लाखे, विशाल दिवनाले, विजय बोरसे, रमेश खराटे, सुनिल दिवनाले, किसन नागे, विकास पाटील देवकते, गोपाल घुले, किशोर घोगे, गणेश चिंचोलकार, सचिन लाखे, श्रीकांत चिकटे, दिलीप काळे, महादेव लहाळे, ऋषीकेष पातोंड, अभिषेक नवलकर, प्रमोद करणकार, सचिन बचे, शुभम पातोंड, निळकंठ पाचपोहे, हरिदास बचे, अजय लासुरकार, नितीन घाटोळ, सतिष बचे, कृष्णराव जुमळे, सुभाष पातोंड, सुरेंद्र दिवनाले, गजेंद्र लाखे, . अरुण वैतकार, प्रज्योत नागे, योगेश खाडे इत्यादींनी परिश्रम घेतले आभार प्रदर्शन गोपाल गावंडे यांनी केले.

# कृषी उत्पन्न बाजार समितीत सोयाबीनची आवक वाढली

## ५३०० ते ५६०० रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी सुरू

प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अकोला :** कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या सोयाबीनची आवक मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहे. त्याचबरोबर सोयाबीनच्या दरातही मोठी वाढ पाहायला मिळत आहे. बाजारात सोयाबीनचे भाव सध्या ५३०० रुपयांपासून ५६०० रुपये प्रति क्विंटल पर्यंत पोहोचले आहेत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आशा निर्माण झाली असून, येणाऱ्या काळात दरात आणखी वाढ होऊ शकते, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीत दररोज मोठ्या प्रमाणात



सोयाबीनची आवक होत आहे. व्यापाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोयाबीनची गुणवत्ता चांगली असल्याने दरात ३०० रुपयांपर्यंत वाढ नोंदवण्यात आली आहे. सध्या सोयाबीन ५३०० ते ५६०० रुपये प्रति क्विंटल दराने विकले जात आहे. दुसरीकडे, शेतकरी या दरवाढीमुळे समाधानी दिसत असले तरी, लागवड आणि उत्पादनाचा खर्च पाहता आणखी चांगला भाव मिळण्याची गरज असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. बाजारात मागणी वाढेल आणि सोयाबीनच्या किमतीत अधिक तेजी येईल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांना आहे. सध्याच्या तेजीमुळे शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी, ते अजूनही अधिक चांगल्या आणि स्थिर भावाच्या प्रतीक्षेत आहेत.

# रस्त्यावरील खड्ड्यांचा वारकऱ्यांना त्रास




प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अकोला :** संत श्री गजानन महाराजांच्या दर्शनासाठी अकोला आणि परिसरातून हजारो भाविक, पालख्या, दिंड्या जात आहेत. परंतु बारा खोली ते गायगाव मुख्य मार्गावरील खड्डे त्रासदायक ठरत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार मागणी करून देखील काहीही उपयोग झाला नाही. प्रगट दिनाचे औचित्य साधून या मार्गाने भाविक मोठ्या संख्येने जाणार आहेत. त्यामुळे वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये अशी मागणी करण्यात आली होती. परंतु संबंधित यंत्रणा जागी झाली नाही. शनिवार, रविवार या मार्गावर होणारी गैरसोय दूर व्हावी अशी अपेक्षा करण्यात येत आहे.

# शहरात गण गण गणात बोतेचा गजर..

## गजानन महाराज मंदिरात प्रगट दिन उत्सव














प्रतिनिधी ७ फेब्रुवारी

**अकोला :** रविवारी संत श्री गजानन महाराजांचा प्रगट दिन आहे. या निमित्त शहरातील मंदिरात धार्मिक आयोजन करण्यात आले आहे. महाराजांचा प्रगट दिन भक्तीभावाने साजरा केला जाणार आहे. कीर्तन, भजनात भाविक न्हाऊन निघाले. श्री गजानन विजय ग्रंथाची शनिवारी सकाळी सांगता झाली. उद्या सकाळ पासून श्रींचा प्रगट दिन साजरा होणार आहे.

### सोमठाणा गावात गजानन महाराज मंदिरात प्रगट उत्सवाची तयारी पूर्ण

सोमठाणा गावात असलेल्या श्री संत शिरोमणी गजानन महाराज मंदिरात प्रगट उत्सव अत्यंत श्रद्धा आणि भक्तीभावाने साजरा केला जात आहे. या निमित्ताने दररोज संत श्री गजानन महाराजांच्या मूर्तीचा वेदमंत्रांच्या जयघोषात अभिषेक आणि विधिवत पूजन-अर्चा केली जात आहे.

सोमठाणा येथील गजानन महाराज मंदिरात सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत श्रीमद् भागवत कथेचे आयोजन करण्यात आले असून, कथावाचक आपल्या सुमधुर वाणीतून भगवंताच्या विविध लीलांचे वर्णन करत आहेत. कथा श्रवणादरम्यान उपस्थित भाविक मंत्रमुग्ध होऊन भक्तीरसात न्हाऊन निघाले असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. श्री संत गजानन महाराज मंदिर संस्थानच्या वतीने दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात येत असून, शेकडो भाविक याचा लाभ घेत आहेत. तसेच, सायंकाळच्या वेळी मोठ्या संख्येने महिला भजन-कीर्तनात सहभागी होऊन कीर्तनकारांच्या माध्यमातून भक्तीमय आनंदाचा अनुभव घेत आहेत. एकंदरीतच, सोमठाणा गावात संत श्री गजानन महाराज प्रगट उत्सवामुळे संपूर्ण परिसर भक्तीरसाने ओतप्रोत भरलेला दिसत आहे.

### संतांमुळे होते भगवंतांचे दर्शन : ह.भ.प. काळे महारार्ज

अकोला शहरापासून तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या ग्राम सोमठाणा येथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात स्थापित श्री संत शिरोमणी गजानन महाराज मंदिर मध्ये प्रकट दिनानिमित्त सप्तदिवशीय श्रीमद् भागवत सप्ताह तसेच कीर्तन महोत्सवाचे आयोजन मंदिराच्या वतीने करण्यात आले आहे. श्रीमद भागवत सप्ताहचा वेळी हभप काळे महाराज उपस्थित भाविकांना श्रीकृष्ण यांची विभिन्न अवतरित लीला व संत महात्म्यांची कथा विस्तृत प्रस्तुत करून उपस्थित होतांना मंत्रमुग्ध केले. दररोज सकाळी संत श्री गजानन महाराजच्या मूर्तीला वेद मंत्राच्या गजराने अभिषेक एवं विधिवत पूजा अर्चना करण्यात येत आहे. सकाळी ९ ते दुपारी १२ वाजेपर्यंत ह-भ-प किशोर महाराज यांचे श्रीमद् भागवत कथा का संपन्न होत आहे. दररोज सायंकाळी प्रसिद्ध कीर्तनकार यांचे कीर्तन संपन्न होत आहे ज्यामध्ये ह-भ-प सुजित महाराज देशमुख, प्रशांत महाराज मामनकर, निलेश महाराज झांबरे, शिवाजी महाराज झांबरे, दादा महाराज कोळमकर व सुजित महाराज देशमुख हे आपल्या अमृतवाणीतून विविध सामाजिक व धार्मिक विषयावर कीर्तन प्रस्तुत करून उपस्थित होतांना मंत्रमुग्ध करीत आहे. कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता संपूर्ण सोमठाणा ग्रामवासी अथक परिश्रम करत आहे

### गजानन महाराजांच्या प्रगट दिनानिमित्त मंदिरावर रोषणाई डाबकी रोड मंदिरात भाविकांची गर्दी

दिव्यांच्या लख्ख प्रकाशात दीपोत्सव साजरा करत प्रगट दिन सोहळ्याची तयारी भाविकांची सुरु आहे. शहरातील प्रत्येक गजानन महाराज मंदिराचा कळस दिव्यांच्या माळांनी उजळून निघाला असून, डोळ्यांचे पारणे फेडणारा हा सोहळा पाहण्यासाठी भक्त आतुर आहेत. माऊलींच्या जयघोषात आणि आतषबाजीत रविवारी गजानन महाराज प्रगट दिन सोहळा होणार आहे.

### गजानन महाराज मंदिर शिवनगरात तयारी पूर्ण

संत गजानन महाराज प्रगट दिनानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन बाळापूर रोड येथील मंदिरात करण्यात आले आहे. नामांकित कीर्तनकारांच्या वाणीतून माऊलींच्या जीवनचरित्राचा उलगडा होत असून, श्रोते भक्तीरसात न्हाऊन निघाले आहेत. टाळ-मृदंगाच्या तालावर रंगलेल्या या भजनाने संपूर्ण परिसर आध्यात्मिक ऊर्जेने भरून गेला आहे.

### नामवंत किर्तनकारांच्या अमृतवाणीतून नित्य किर्तनसोहळा

**श्री गजानन विजय ग्रथांचे सामूहिक पारायण**

'माणुसकी हीच खरी ईश्वर सेवा' हा संदेश देणाऱ्या गजानन महाराजांच्या प्रगट दिन रविवारी आहे. त्या निमित्त देशमुख पेठ येथील गजानन महाराज मंदिरात श्रीमद भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाचे स्वरूप केवळ धार्मिक न ठेवता, सामाजिक भान जपत भक्तांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात भाविकांनी सहभाग घेतला आहे. अनेक भक्तांनी माऊलींच्या चरणी ही 'सेवा' अर्पण करत आजचा दिवस सार्थकी लावण्यात आला.

### कौलखेड येथील गजानन महाराज मंदिरात विविध सोहळ्याचे आयोजन

'गण गण गणात बोते' च्या गजराने अवघी नगरी दुमदुमली असून, आज संत गजानन महाराज प्रगट दिनापुर्वी प्रगटदिन महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. फुलांनी सजवलेल्या माऊलींच्या दर्शनासाठी भाविकांनी पहाटेपासूनच मोठी गर्दी होत आहे. ठिकठिकाणी होणाऱ्या विविध धार्मिक सोहळ्यातून भक्तीचा एक अनोखा सोहळा अनुभवायला मिळत आहे.

### केशव नगर व किर्ती नगर येथील गजानन महाराज मंदिर

**भाविकांच्या कल्याणासाठी मंदिर विश्वस्तांचे आहे प्राधान्य**
**गजानन महाराज मंदिरावर करण्यात आली उत्तम सजावट**

प्रगट दिनाचे औचित्य साधून स्थानिक गजानन महाराज मंदिरात ठिकठिकाणी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' या उक्तीप्रमाणे हजारो भाविक माऊलींचा आशीर्वाद घेताना दिसत आहे. भक्तांच्या निस्वार्थ सेवेने मंदिर परिसरात आज चैतन्याचे वातावरण पाहायला मिळत आहे. केशव नगर आणि किर्ती नगर स्थित गजानन महाराज मंदिरात उत्साही वातावरण होते.

### व्हिएचबी कॉलनी, जवाहर नगरातील गजानन महाराज मंदिरात धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

शेगावच्या धर्तीवर आज शहरातही गजानन महाराज प्रगट दिन विधीवत महापूजा आणि अभिषेकाने सुरू झाला. या मंगलमयी सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी शहरातील गजानन महाराज मंदिरात भाविकांची मोठी उपस्थिती आहे. अखंड हरिनाम सप्ताह अनेक मंदिरात आयोजित करण्यात आला.

### संत श्रेष्ठांच्या दर्शनासाठी भक्तांची आस

◆ठिकठिकाणचे भाविक प्रगट दिनी संत श्री गजानन महाराज यांचे दर्शन घेण्यासाठी शेगावला पोहचत आहेत. संत श्रेष्ठांच्या दर्शनाची आस भाविकांना आहे. या बाबत भाविकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. दोन दिवस संस्थान दर्शनासाठी रात्रभर खुले राहणार आहे.

CLASSIFIED

पाहिजेत...!
» ITI » CNC Operator
» Coreldraw Designer/ Photoshop
» Salse Executive
कंपनीमध्ये पाहिजे आहे.
पगार अनुभवाप्रमाणे 9 ते 12 हजार
-: पत्ता:-
बोर्ड वाला डॉटकॉम
सातूर्णा एमआयडीसी, अमरावती
इच्छुकांनी Resume Whatsapp करावा
» 9172914161 «
» valbhav bobade » Boardvala.com

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135